


स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जि[illegible]कर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री सा ई वा क्सु धा

हा सारा संसार आमचा आम्हींच निर्माण केलेला आहे. त्याला कंटाळून किंवा त्रासून कसें बरें चालेल ? तो नीटनेटका चालवूनच सुटका. पूर्व सुकृताप्रमाणें हा जन्म मिळाला व आपल्या सभोंवार पसारा गोळा झाला. पूर्वजन्मींचें हें बरेंवाईट सुकृत आहे. तें वाट्यास येईल तसें भोगल्याशिवाय कोणाचीही सुटका होत नाहीं. पूर्व सुकृतानुरूप कोणी संसारी, कोणी ब्रह्मचारी, कोणी संन्याशी, कोणी श्रीमंत, तर कोणी गरीब होतो. जी जी स्थिति प्रारब्धानुसार वाट्यास येईल ती शोभवून दाखविणें व सुटका करून घेणें हेंच आपलें कर्तव्य. देव एका हातानें देतो .आणि दुसऱ्या हातानें घेऊन जातो. आपण त्यामुळें सुखी किंवा दुःखी कष्टी होतों. त्याचें मूलभूत कारण म्हणजे अज्ञान हेंच होय. तें घालविण्याचा आपण झटून प्रयत्न केला पाहिजे.

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष २८ वें ] नोव्हेंबर १९६० [ अंक ८ वा

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इंकं. बिल्डिंग, ४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं.

# प्रिय वाचक—

दिवाळी प्रतिवर्षी येते आणि दिव्याबत्त्यांच्या रोषणाईनें व अन्यप्रकारें आपण ती यथाशक्ति साजरी करतों. घरादारांतील व कोनाकोपऱ्यांतील अंधःकार नाहींसा करून तेथें प्रकाशज्योति पेटविण्यांत आपण दंग झालेले असतों. दीपावलि म्हणजे जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट व काळोखाचा नायनाट. सर्वत्र प्रकाशाचें साम्राज्य पसरून दिवाळी आली आणि गेली; परंतु त्यामुळें आमच्या अंतःकरणांत एखादा प्रकाश किरण शिरला का ?

× × ×

'अंतरिंचा ज्ञान दिवा मालवूं नको रे'— असें आमचे साधुसंत सांगत आले आहेत. श्रीसाईबाबांची तर दिव्याबत्त्यांच्या रोषणाईवर भारी भक्ति होती. शिरडींत आल्यानंतर त्यांनीं जो पहिला वहिला नेत्रदीपक चमत्कार करून सर्वांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें तो म्हणजे आपल्या निवासस्थानीं तेलाशिवाय केवळ पाण्याच्या सहाय्यानें पणत्या पेटविण्याचा होय.

साईबाबा पणत्या पेटविण्यासाठीं रोज रोज तेल मागायला येतात ! यांचें काय आपण देणें लागतों ? अशा विचारानें तेलाचें दान देणाऱ्या सर्वांनीं एके दिवशीं त्यांना तेल देण्याचें नाकारलें. परिणाम काय झाला ? बाबांच्या पणत्या पेटायच्या थांबल्या नाहींत ! काळोख नाहींसा करून तेथें प्रकाशाचें साम्राज्य सुरू करण्याची बाबांना भारी हौस. अशा रीतीनें जनतेच्या मनांतील काळोख, किल्मिष त्यांना नाहींसें करून टाकायचें होतें. बाबा प्रकाशाचे पुजारी होते. त्यांना लोकांचीं अंतःकरणें पणत्यांच्या रूपानें पेटवायचीं होतीं. व्यापाऱ्यांनीं तेल नाकारलें म्हणून ते डगमगले नाहींत. डगमगतील कशाला ? वाटेल तें करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं होतें. त्यांना दुःख झालें तें व्यापाऱ्यांच्या ठायीं वास करणाऱ्या अज्ञानांधकाराचें ! अज्ञानाचा नाश करून त्या ठिकाणीं ज्ञानाची स्थापना करण्यासाठी बाबांचा अवतार होता.

× × ×

प्रत्येकाच्या अंतरांत भगवंताच्या—परमात्म्याच्या रूपानें ज्ञानज्योत सदासर्वकाळ पेटत आहे. परंतु तिच्यावर अज्ञानाचा पडदा ओढला गेल्यामुळें अंतरांत काळोख पसरलेला आहे. अंतरांतील तो दिवा आपण पेटता ठेवावा, आपण सदासर्वकाळ जागृत रहावें, तो दिवा मालवूं नये, आपणास प्रकाशाकडे जावयाचें आहे, काळोखांत नव्हे तर प्रकाशांत निरंतर वावरावयाचें आहे, स्वतः प्रकाशमान् होऊन इतरांनाही प्रकाश द्यावयाचा आहे व जन्मा आलियाचें सार्थक करावयाचें आहे, याची आठवण करून देण्यासाठीं दिवाळी येते किंवा श्री साईबाबा यांच्यासारखे सत्पुरुष वेळोवेळीं अवतीर्ण होऊन पणत्या पेटविण्याच्या रूपानें आम्हांला दिव्य संदेश देऊन जातात.

× × ×

नुकतीच दिवाळी येऊन गेली. सर्वत्र प्रकाशाची लयलूट करून जाणाऱ्या त्या आठ वड्यामुळें आम्हांला बाबा शिरडींत पणत्या पेटविण्याच्या रूपानें दिवाळी साजरी करीत असत त्या प्रसंगाची आठवण झाली. सर्वांना प्रकाश देणें, अज्ञानांधकार नाहींसा करणें हें बाबांचें जीवनकार्य होतें. आणि म्हणून केवळ पणत्या पेटविण्याच्या रूपानेंच नव्हे तर परोपरीनें जनतेच्या, आपल्या भक्तांच्या अंतरांतील ज्ञानदीप ते पाजळीत होते, हळुवार हातानें त्याची वात ते पुढें पुढें सरकवीत होते. प्रत्येकानें स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करावा, झोपी न जातां जागृत रहावें, सर्वांकडे आत्मौपम्येन दृष्टीनें पहावें, दुजा भाव किंवा द्वेषभाव सोडावा हीच त्यांची शिकवण होती.

× × ×

काळोखाला पायांखालीं तुडवीत प्रकाशाकडे धांव घेणें व सतत प्रकाशांत वावरणें यांतच आपली इतिकर्तव्यता आहे. वेदकाळापासून सारे ऋषिमुनी व साधु-संत आपणाला सांगत आले आहेत व परमेश्वराला प्रार्थित आले आहेत कीं, ' तमसो मा ज्योतिर्गमय– ' हे भगवंता ! मला समोंवार पसरलेल्या काळोखांतून प्रकाशाकडे घेऊन जा. माझें अज्ञान नाहींसें कर, सदासर्वकाळ मला ज्ञानसूर्याच्या प्रकाशांत तळपूं दे, वावरूं दे.

किती मोलाचें मागणें आहे हें. प्रति वर्षी येणारी दिवाळी काय, किंवा श्रीसाई-बाबांसारखे सत्पुरुष काय, हीच दिव्य मागणी आमच्यापुढें ठेऊन जातात आणि ही किंवा हां दिव्य संदेश झेलणें व तो आचरणांत आणण्यासाठीं झटणें, यांतच आमचें जीवनसाफल्य आहे.

—संपादक

---

सध्यां जगांत महान् क्रांति घडून येत आहे. जुन्या दृष्टीनें तिच्याकडे पाहून चाल-णार नाहीं, नव्हे आपणांस जगतांही येणार नाहीं. नव्या दृष्टीनें विचारशक्ति विकसीत केली पाहिजे, तरच आपण वरच्या पातळीवर जाऊन पोहोंचूं. ॲटम बॉम्बनें आपल्या जीवनाची सारी घडण आरपार पालटून टाकली आहे. त्यामुळें आज आपण नव्या जगांत वावरत आहोंत. जुना दृष्टिकोण टाकून नव्या चष्म्यानें त्याकडे पाहूं तरच आपला निभाव लागेल, एरवीं नाहीं.

—स्वामी सुद्धानंद ( अमेरिका )




**************** संकलक : **आमचे प्रतिनिधि** ****************

**कै. तात्याबा कोते यांचे अनुभव —** (मागील अंकावरून)

बाबा कित्येकवेळां मजबरोबर कुस्ती खेळत. मी त्यांचे कमरेखालीं हात घाली व त्यांना तसेंच एका हातानें उचलून अंगावर घेई. "अरे, अरे पडेन मी, पडेन मी. तुला गांठ येईल" असें म्हणत. मग मी त्यांना सोडून देई. ते मग हंसत.

कित्येक वेळां मी त्यांचें डोक्यावरचें फडकें सोडी व त्यांचे डोक्यावर मी आपली शिंदेशाही पगडी घाली. माझें उपरणें त्यांना पांघुरवी व त्यांना एक आरसा आणून देई. मग ते हें रूप आरशांत पहात व खांदे वर करीत डोळे मिचकावीत. वेड्यावांकड्या माना हालवीत व आरशांत पहात व आरशांत पाहून म्हणत कीं, "कायरे, हा कोत्या असाच दिसतो नाहीं रे, आणि असंच करतो नाहीं रे!" व मग पगडी उपरणें आरसा मजजवळ देऊन टाकीत. हें सर्व बसल्या बसल्याच करीत.

कित्येक वेळां चट्कन उठून माझे पायास हात लावीत; बाबा हें काय करतां हें चांगलें कां ? म्हणून मी बोलें व त्यांचे हात धरी; इतक्यांत ते पुन्हां माझे हातास झटका देत व माझे पायांस हात लावीत व नमस्कार करीत. मी म्हणे, 'बाबा हें कसं काय आहे!' ते म्हणत, 'गप बस, तुला काय माहीत आहे!'

कित्येक वेळां माझ्यापुढें दोन हात जोडीत व दुरूनच मला नमस्कार करीत व जय देवा, जय देवा असें म्हणत.

मी त्यांना कित्येक वेळां 'बाबा, सलाम आलेकुं सलाम, आलेकुं' असें कपाळास पालथा हात लावून म्हणे. तेंही मला कपाळावर पालथा हात ठेवून, सलाम आलेकुं, सलाम आलेकुं, म्हणत.

**तात्याबांचा हट्ट**

एकवेळां बाबांनीं मला अफूकरितां, विड्याच्या पानाकरितां व बोरांकरितां ४ रु. दिले व त्याचा बाजार करून आण असें सांगितलें. मीच त्यांचा बाजार नेहमीं करीत असें. रहात्याहून हें सामान आणीतसें. त्या दिवशीं सर्व सामान आणलें व चांगलीं बोरें आणलीं. व हें सामान व बोरें बाबांच्यापुढें ठेविलीं व म्हटलें, 'बाबा, तुम्हीं बोरें आणावयास सांगितलीं ती मी आणली. बाबा ती मला व म्हाळसापतीस देऊं लागले, तुम्ही खा एकदोन तरी खा, तर मी खाईन. ते म्हणाले, मी आतां खात नाहीं. मी म्हटलें,

मीही आतां खात नाहीं. ते म्हणत, तूं खारे. मी म्हणें, खाणार नाहीं. अशी माझी व त्यांची बराच वेळ हुज्जत चाले. शेवटीं हे आतां खात नाहींत असें पाहून मी तीं सर्व बोरें रुमालांत बांधलीं व घरीं घेऊन गेलों. रात्रीं निजावयास आलों तेव्हां पुन्हां तीं बोरें बाबांच्यापुढें ठेविलीं व आतां तरी खा, असें म्हटलें. ते म्हणाले, तूं खा व दुपारच्याचप्रमाणें त्यांची व माझी हुज्जत सुरू झाली. शेवटीं मला खूप राग आला. मी तीं सारीं बोरें घेतलीं व खालीं पटांगणांत भिरकावून दिलीं व चावडींत तमाशा पहावयास निघून गेलों. बाबांनीं व म्हाळसापतींनीं तीं सर्व बोरें वेचलीं. व म्हाळसापती मला बोलवावयास आले. मी गेलों नाहीं. दोन तीन वेळां बोलावण्यास आले. मी गेलों नाहीं. शेवटीं एकदां गेलों व बसलों. बाबांनीं त्यांतली थोडीं बोरें पुन्हां म्हाळसापतीला दिलीं. थोडी मला देऊं लागले. मी म्हटलें, तुम्ही खा तर मी खाईन. ते म्हणत,तूं खा. मला राग आला व मी पुन्हां तेथून उठून तमाशा पहाण्यास गेलों. मला पुन्हां दगड्या, कोंडाजी, बोलवावयास आले. मी गेलों नाहीं. मग म्हाळसापती आले व म्हणाले, चला, बाबा ताटकाळले आहेत. मला झोंप घेऊं देत नाहींत. मी जरा आढेवेढे घेतले पण मग गेलों. पण मी धुश्शांतच होतों. बाबांनीं एक दोन बोरें तोंडाला लावलीं. व कांहीं म्हाळसापतीस दिलीं. व म्हणाले, म्हाळसापती, तूं बोरें खाय, आन त्याला ( मला ) खाय म्हणावें. मग मी खाल्लीं. पण माझ्याशीं बोलले नाहींत. मग आम्ही निजलों.

**बाबांचा हट्ट**

मी पूर्वी श्रावणी सोमवार, बारा महिन्याच्या एकादश्या व महाशिवरात्र करीत असें. पुढें मी बाबांच्या मशिदींत निजावयास जाऊं लागलों, तेव्हां बाबा मला मुद्दाम त्या त्या उपासाच्या दिवशीं मटन, कोळंब्यांतील रताळीं व इतर जेवण जेऊं घालीत, पानाचा विडा देत व म्हणत, अरे, कसले सोमवार, अन् कसल्या एकादश्या अन् कसली शिवरात्र करतो. हें खाय, हें खाय. एका शिवरात्रीस मी म्हटलें, मला शिवरात्रीचें तरी हें खाऊं घालूं नका. ते म्हणाले, खाय, काय की शिवरात्र. दादा केळकर मला म्हणाले, कीं ते सांगतात तर तुम्ही खा. त्यांची आज्ञा मोडूं नका. मग मी खाल्ले व तेव्हांपासून सोमवार, एकादश्या व शिवरात्र मी सोडून दिली.

कधीं कधीं बाबा श्री द्वारकामाईत दिवसा ४-५ चे सुमारास नाचण्याचे तालांत नाचत असत. वांकडी मान,वाकडा पाय, वांकडे हात करीत डोळे मिचकावयाचे. थट्टेचे बोल बोलत. गातही. हातांत मुरली धरून, जसे कृष्ण परमात्मा दीड पायावर नाचत तसे बाबा नाचत; वांकुल्या दाखवीत. हातांत मात्र कांहीं घेत नसत. पण हातांत मुरली, वेणू किंवा पावा घेऊन, वाजवून जसें नाचावे तसें दीड पायावर व हातांनीं मुरली वाजविण्याचे हावभाव करून मागें पुढें पावलें टाकून नाचत व मजा करीत. पोरासोरांसमवेत किंवा कोंडाजी मुसलमान, महादु घोडेवाला देखत नाचत—माना वांकड्या तिकड्या करून पिंगाही घालीत, घे टिकोऱ्या, घे धतुऱ्या असें तोंडानें म्हणून, डावा हात अडवा करून, त्याचे पंजावर उजव्या हाताचा दंड ठेवून नाचत.

रोज १०–१५ रुपयांची बर्फी, किंवा रेवड्या, खारिक्या, बत्तासे, पेढे, शेंगदाण्याचे काजू, हलवायाच्या दुकानांत जें असेल तें बाबा विकत घेत असत व सर्वांना वाटून देत. त्यांचेबरोबर मलाही देत.

मी रोज रात्रीं बाजरीची भाकरी, दूध व गूळ सुमारें ८॥ ला त्यांना आणून देई. त्यापैकीं अर्धी पाऊण भाकरी दुधांत कुसकरून त्यांत गूळ घालून त्यांना देई व ते त्यापैकीं थोडेसें खात व नंतर ताट पुढें सारून देत. ताटांत राहिलेली भाकर व मी आणल्यापैकीं (मी दोन भाकरी आणी) शिल्लक राहिलेली मग कोंडाजी घेऊन जाई. त्यांचें हें खाणें झालें म्हणजे मी त्यांचेपुढें फक्त सावण्याचें लहानसें ताट ठेवी. मग त्यापैकीं ५–६ अगोदर माझे तोंडांत आपले हातानें घालीत. नंतर २–४ आपण खात. कोंडाजी त्यांना विडे करून देत. बाबा सर्वांच्या अंगावर एक एक फेंकीत व आपण खात. याप्रमाणें लागलीच दोन घोट पाणी पीत. दिवसा रात्रीं विडे खात; पुष्कळ खात व ते सर्व कोंडाजीच करून देई. राधाकृष्ण आल्यानंतर मात्र पुढील व्यवस्था त्या करूं लागल्या.

## राधाकृष्णांची कामगिरी

राधाकृष्णांचें चरित्र म्हणजे राधाविलास असावा असें मला वाटतें. त्या खालील कामें करीत :—

(१) त्या पहांटेस उठून, मशिदीचें पटांगण, बाबांच्या फेरीची व परसाकडेची वाट व भिक्षेला जाण्याची वाट किंवा रस्ते झाडून काढीत.

(२) कमानी आणून वेल लावले. बाबांच्या फेरीच्या रस्त्यावर चावडींत जाईपर्यंत वेल लाविले व कमानी केल्या.

(३) चावडीची मिरवणूक, लोखंडी १०० टेंभे, पालखी (पालखींत बाबांचे कपडे टाकावयाचे) व घोड्यासहित मिरवणूक. त्यांनींच घोडा आणण्याची व्यवस्था केली. त्यांनींच पालखी, रथ, घोडा, बसावयाच्या सतरंज्या, जाजमे, पायघड्यास बनात, गालबोटा, पैठण्या, जरीचे शेले वगैरे सामान त्यांनींच आणलें. चावडींत व मशिदींत कापडाचे पडदे.

(४) अब्दागिर, मोरचेलें, चवऱ्या, चोपदार, छडीदार यांच्या काठ्या, पडदे [बाबा चावडींत जाऊं लागले म्हणजे] वरती लावावयाचे व टेंभे जाळावयाचे.

(५) वाजंत्री, तासे.

(६) भजन.

(७) सर्व विड्यांचें सामान ठेवणें, व विडे करून बाबांच्याकडे पाठविणें. सावण्याच्या ताटांत विडे ठेवावयाचे.

(८) सावण्यांची व शेंगदाण्याचे काजू भरून बाबांचेकडे रोज रात्रीं ताटें पाठवावयाचीं. पाण्याची झारी बाबांना पाणी पिण्याकरितां तात्याबाबरोबर पाठवावयाची.

(९) दिवे, लाईट.

( १० ) तोंड धुण्यास सकाळीं गरम पाणी, न्याहरी—यांत २ लाडू, बदाम रोटी, दहीं, दूध ( वाट्या ), लोणी, खडीसाखर पाठवीत.

( ११ ) दुपारीं शिरा ( १ शेर ), तांदुळाची खीर ( १ शेर तांदुळांची ), पुऱ्या किंवा पोळ्या, घुगऱ्या, भजीं, भाज्या वगैरे २—३ ताटें भरून पाठवीत.

( १२ ) तिसरे प्रहरीं पुन्हां फराळाचें पाठवीत.

( १३ ) सायंकाळीं तात्याचा वरप्रमाणें, भाकरी, दूध, दहीं साबण्या वगैरे.

प्रथम वस्तींत [ भिक्षा ] सकाळीं ८—८॥ वाजतां जात. वस्ती म्हणजे भिक्षा हा कसा अर्थ झाला तें कळत नाहीं.

बाबांच्या दोन गाई व शेळ्या होत्या. त्या तात्याबाकडे असत. त्यांचेंच दूध, दहीं, लोणी, ताक, तूप बाबा खात. तात्याबाकडे गाई व शेळ्या होत्या व आहेत. माधवराव देशपांडे यांचेकडे गायी व शेळ्या होत्या.

## पंढरपूरच्या यात्रेची गोष्ट

प्रथम राधाकृष्ण पंढरपुराहून येथें आल्या. व महिन्या दीड महिन्यांनीं त्या, बाळा शिंपी, महादु फसल्या, आषाढी एकादशीचे वारीकरितां पायीं पायींच पंढरपुरला गेल्या. मी, माझी आई व आणखी २—४ मंडळी अशा मंडळींनीं आम्हीपण बेत केला कीं आपणही प्रथम नगरास जाऊं व तेथें वरील मंडळीस गांठूं व त्यांचे बरोबर पायीं पायीं पंढरपुराला जाऊं. त्याप्रमाणें आम्ही निघालों. मी, माझा मेहुणा विठोबा जगताप, लक्ष्मीबाई शिंदी, माझी आई वडील मुलगी दगडी ३—४ वर्षांची व आणखी ३—४ बाया असे निघालों. बाबांनीं उदी दिली व परवानगीही दिली. सामानसुमानाच्या तीन गाड्या भरून विहिरीच्या वडाचे झाडाखालीं उभ्या केल्या. आम्ही पुणतांब्यावरून निघालों. मी मारुतीस नारळ फोडला. व शनि महाराजांस नारळ फोडण्यास गेलों. ४०—५० मंडळी आम्हाला घालवण्याकरितां वडाजवळ जमली होती. इतक्यांत बाबा हल्लीचें मंदिराचे पडित जागेवर उभे राहिले. कोंडाजी मुसलमान मला बोलवावयास आला. मी शनि महाराजास नारळ फोडीत होतों. इतक्यांत कोंडाजी म्हणाला, 'तुम्हांस बाबांनीं बोलाविलें आहे.' मी गेलों. बाबा म्हणाले, चल. मी त्यांचे बरोबर मशिदीत गेलो. कांहीं मंडळी मजबरोबर आली व कांहीं गाड्याजवळ उभी राहिली. बाबा आपल्या जागेवर बसले. मी कठड्याजवळ बसलों. माधवराव समोर बसले. माधवरावांनीं चिलीम भरली. बाबांनीं ओढली. कोणी बोलेना, चालेना. माधवराव म्हणाले, देवा, तुझी बायजामामी, व दुसरी मंडळी वडापाशीं उभी राहिली आहेत. तात्या येथें आला आहे. मंडळीं खोळंबली आहेत. बाबा म्हणाले, बायजामामीला हाका मारा, इकडे माझी म्हातारी आली व म्हणाली, बाबा कशाला हांक मारली ! दिवस लई वर आला—मंडळी खोळंबली, बाबा म्हणाले, घरीं जा. आज जावयाचें नाहीं. बाबा म्हणाले, बायजामामी, आज जाऊं नये, उद्यां जाऊं नये, परवाचे दिवशीं कोणाला विचारूं नये. पहांटेस जावें तडक धूम. ही घे उदी. ती म्हणाली, बरं आहे, बाबा, परवां

जाऊं. गाड्या परत केल्या. सर्व मंडळी आपापल्या घरीं गेली. माधवरावांनीं पंचांग आणिलें व पाहिलें तों तो दिवस खरोखरींच वाईट होता.

## बाबांनीं आनंदानें निरोप दिला

नंतर तिसरे दिवशीं पहांटे आम्हीं निघालों. बाबांनीं आनंदानें उदी लाविली व आम्हांस वाटेला लाविलें. त्याप्रमाणें पुणतांब्याचे स्टेशनवर गेलों. तेथें गंगेवर स्नान केलें, फराळ केला व गाडींत बसलों. सकाळीं ८ वाजतां जेऊर स्टेशनवर उतरलों. तेथें आम्हांस राधाकृष्ण वगैरे मंडळी ९–१० वाजतां भेटली. तेथें जेवणखाण जेवण खाण केलें व आम्ही नरसिंगपुरास नरसिंह महाराजांचे दर्शन घेण्यास पायीं गेलों. राधाकृष्ण वगैरे मंडळी आमचे बरोबर होती. ( जेऊरहून नरसिंगपूर ६ कोस व नरसिंगपुराहून पंढरपूर १४ कोस ). नंतर नरसिंगपुराहून आम्ही निघालों. व मध्यें पुन्हां एका गांवीं मुक्काम केला. तेथें सर्व दिंड्या ( देहू, आळंदी, बेलापुर, पैठण, निवृत्तिनाथ महाराजांची पालखी ) आल्या होत्या. तेथून दुसरे दिवशीं म्हणजे दशमीचे दिवशीं सकाळीं निघालों. व सायंकाळीं पंढरपुरला पोहोंचलों. माधवरावांनीं नानासाहेब चांदोरकरांना आमच्या येण्याबद्दल पत्र दिलें होतें. बाबांची परवानगी घेतली. मंडळी आमचे घरीं येते व बायजामामीस बाबांनीं परवानगी दिली, आतां आम्ही येतो बरं कां ? असें विचारण्याचा काकासाहेब, नानासाहेब चांदोरकर यांचा पाठ होता.

नानासाहेबांनीं चंद्रभागेच्या तीरावर दिलेल्या एका धर्मशाळेंत राधाकृष्ण, बाळ शिंपी व महादू फसल्या ही मंडळी उतरली. आम्हीं आपल्या बडव्याच्या घरीं उतरलों.

## पंढरपुरांत कॉलऱ्याचा जोर

एकादशीचे दिवशीं तेथें कॉलरा सुरू झाला. फार जारीनें सुरू झाला. द्वादशीचे दिवशीं तर पराकाष्ठाच झाली. आमची म्हातारी व आमचे बरोबरची दुसरी मंडळी घाबरली व म्हणाली चला आतां आपले घरीं. आम्हीं म्हटलें कीं, आम्हीं पूर्णिमेची लाही घेतल्या, खेरीज (काला केल्या खेरीज) येथून जाणार नाहीं. म्हातारी फार घाबरली. नानासाहेब चांदोरकरांकडे गेली व म्हणाली, तात्या ऐकेल तर फक्त तुमचेंच ऐकेल. करतां त्याला दोन गोष्टी सांगून त्याला येथून काढून घ्या. त्याप्रमाणें नानासाहेबांनीं मला व बाळा शिंप्यास द्वादशीचे दिवशीं सायंकाळीं आपले घरीं बोलाविलें.

माधवराव त्या वेळीं अस्तगांवचे पाटील होते. बाबांनीं त्यांना आगगाडीनें पाठविलें व राधाकृष्णाला व ह्या सर्व मंडळीला घेऊन ये, राधाकृष्णाला सोडून येऊं नको असें सांगितलें.

कॉलऱ्याचा जोर फार; मंडळी घाबरली, असें पाहून बाबांनीं माधवरावांस पंढरपुरास रवाना केलें. ते दशमीचे दिवशीं संध्याकाळीं पंढरपुरला आले व नानासाहेब चांदोरकरांकडे उतरले.

## बाबांची दक्षता

पंढरपुरला कॉलरा होणार, मंडळी घाबरणार, हें बाबांना माहीत होतें व त्यांना

पंढरपुरला जाऊं नका असें तर कांहीं म्हणतां येत नाहीं म्हणून बाबांनीं माधवरावांना परभारें मालगार्डीतून त्याच वेळीं जाण्याची तयारी करण्यास सांगितलें. माधवरावांनीं त्याप्रमाणें तयारी करून नानासाहेबांस कोण कोण मंडळी येत आहेत याबद्दल पत्रहि लिहिलें व तेहि पंढरपुरला गेले. त्यांची आमची गांठ दशमीचें दिवशींच संध्याकाळीं पडली. नानासाहेब मला म्हणाले, 'तात्या, कॉलऱ्याचें मान फार आहे. आज ३०० चा आंकडा आहे. तुझ्या घरीं माणसें घाबरतील. तर तूं मंडळी घेऊन जा.' तो द्वादशीचा दिवस होता. आम्ही कबूल केलें. बाळ्यानेंहि कबूल केलें. त्याप्रमाणें सकाळीं त्रयोदशीस आम्ही सर्व पांडुरंगाचें दर्शन घेऊन निघालों व नावेंत बसून या कडेला आलों.

× × ×

**पादुकांचा चमत्कार—**

श्री. बा. ग. नाडकर्णी बी. ए., सिक्युरिटी ऑफिसर, कॅरोना साहु कं. [प्रायव्हेट] लि. केव्हज रोड, जोगेश्वरी, हे आपणांस श्री साईबाबासंबंधीं आलेला अनुभव निवेदन करतांना लिहितात कीं, आमच्या घराण्याचें दैवत श्री मंगेश [गोवा] हें असलें तरी पूर्वीपासून आमचे वाडवडील, श्री दत्ताची उपासना करीत आले आहेत. माझे वडील गुरुचरित्र मोठ्या भक्तीभावानें वाचीत असत व तेही दत्तभक्त होते. माझ्यांत मात्र ती धर्मप्रवृत्ति जवळ जवळ नव्हती. आणि १९५३ सालीं आलेला जो अनुभव मी येथें सांगणार आहे तेथपर्यंत तरी श्री साईबाबांकडे माझें लक्ष नव्हतें. मी आस्तिक नाहीं व नास्तिकही नाहीं. माझी पत्नी मात्र श्री साईबाबाकडे १९५३ च्या सुमारास वळूं लागली होती. ती श्रद्धावान् आहे.

१९५३ सालीं मी, पत्नी व मुलांबाळांसह वास्को-ड-गामा [गोवा] येथें नोकरीनिमित्त रहात होतों. माझ्या वडिलांची एक ट्रंक माझ्याजवळ होती. ऑक्टोबर १९५३ मध्यें त्यांतील चीजवस्त तपासीत असतां मला वडिलांची गुरुचरित्राची पोथी त्यांत सांपडली व मी तिचें पठण करावें अशी मला भावना झाली. त्यांत सांगितलेले नियम पाळून त्या पोथीचें मी सात दिवस पारायण केलें. तो सप्ताह संपल्यानंतर १।२ दिवसांनी आमचे एक मित्र डॉ. मुल्की हे मंगलोरहून मुंबईस जात असतां आमच्याकडे उतरले. तें साई-बाबांचे भक्त होते. अनेक वेळां ते शिरडीला जाऊन आले आहेत. त्यांनीं बाबासंबंधीं आपणास व इतरांस आलेले कित्येक अनुभव आम्हांला सांगितले. बाबा शिरडी येथें असतांही ते ( डॉ. मुल्की ) शिरडीस त्यांच्या दर्शनासाठीं गेले होते. माझी पत्नीहि त्यांचे अनुभव ऐकत होती. आम्हीं त्यावेळीं म्हणालों कीं, बाबा अनेक लोकांस अनेक प्रकारें आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात; तशीच त्यांनीं आम्हांला करून दिली तर काय बहार होईल!

या घटनेस १।२ दिवस लोटले आणि ता. २५ ऑक्टोबर १९५३ रोजीं सकाळीं १० वाजण्याच्या सुमारास माझी पत्नी मसाला दळीत होती. दळणें संपल्यानंतर जात्याची

पेढे तिनें धुतली व तें पाणी घराच्या बाजूस बऱ्याच दिवसांपासून पडून असलेल्या एका दगडावर फेकलें. दगडाची लांबी रुंदी ९×६ एवढी होती, त्या दगडावर पाणी पडल्यामुळें त्यावरील केरकचरा धुवून निघाला आणि त्यावर दोन पावलें दिसूं लागलीं. माझ्या पत्नीनें तीं पहातांच तो दगड तिनें आणखी पाणी घेऊन चांगला साफसूफ केला. तेव्हां पावलें अगदीं स्पष्ट दिसूं लागलीं. विशेष म्हणजे शिरडींत द्वारकामाई समोर जो दगड आहे तसाच त्याचा आकार आहे. तो दगड आम्हीं संभाळून ठेविला आहे.

माझें गुरुचरित्राचें वाचन, एका साईभक्ताचें आमच्या घरीं आकस्मिक आगमन व त्यांच्या संबंधींच्या अनुभवाबाबत आमचें झालेलें संभाषण व आम्हांला आलेला हा पादुकांचा अनुभव, या गोष्टी लागोपाठ घडत गेल्या. त्या वेळेपासून मी बाबांचा भक्त बनलों. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. तेथपर्यंत आमची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नव्हती; परंतु त्यानंतर बाबांच्या कृपेनें परिस्थिति आस्ते आस्ते सुधारत गेली.


लहान मुलाच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं.
दवाबझार, मुंबई २

अर्नाळकर ब्रदर्स

चष्म्यांचे व्यापारी

आमच्या येथें डोळ्यांची मोफत तपासणी करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
बाबूराव अर्नाळकर
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४

वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# नीलवर्ण घनःश्याम

**प्रकरण २ रें** लेखक : के. कृ. प्रधान, बी. ए. एलएल्. बी.

## वासुदेवाचें मथुरेंत पुनरागमन

**'नको आतां देवा उघडूं नयन'**

सर्व प्रकृतिबद्ध अणुरेणुंमागील हा आदिपुरुष आपणांस सतत दिसूं लागला म्हणजे सर्वच ठिकाणीं एक घनदाट चैतन्यच चैतन्य पसरलें आहे, अशी आपली मनोमय खात्री होते व या चैतन्य प्रवाहाबरोबरच वाहणारें सत्य व आनंद यांचे तितकेच घनदाट भरलेले प्रवाह त्या चैतन्य प्रवाहाला मिळून त्रिवेणी संगम आपल्या दिव्य दृष्टींत निर्माण होतात. हा चराचराला अधिष्ठान असलेला सत्, चिद् आणि आनंददायी आदिपुरुष पूर्ण निराकार–निर्गुण–शांत अव्यय अशा अवस्थेंत–जगाच्या आदि आणि अन्तापलिकडे–मोक्षाच्या एकान्त–अवस्थेंत आपल्या नजरेस पडतो. ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वी आपल्या ठिकाणीं अतीव वैराग्य निर्माण व्हावें लागतें. जगांतल्या कोणत्याहि चल अथवा अचल वस्तुमात्रावरील आपली प्रीति अगदीं शून्यावस्थेप्रत पोंहचते. परमेश्वरानें निर्माण केलेली ही अपरंपार विविधतेची संपत्ति–आपल्या सुख व आनंदास अपुरी–अगदीं तुटपुंजी पडून–परमेश्वराची एरवीं अगाध वाटणारी कल्पकता–आपल्या कौतुकाचा विषय न होतां, उलटी तिरस्करणीय भासूं लागते. रोजरोज उगवणारे तेच तेच सूर्य चंद्र व तारे–रोज रोज समोर दिसणारी तींच तीच दृश्यें, रोज भेटणाऱ्या त्याच त्याच व्यक्ति–निव्वळ पोटासाठीं आपण करीत असलेली तीच तीच धडपड–आपल्या जीवनांत किंचित् बदल वाटण्यास लावणारे तेच ते ऋतु–एक ना दोन–सर्वच गोष्टी आपणांस नीरस–रुक्ष वाटूं लागतात व 'नको देवा आतां उघडूं नयन–न साहवे जीवन क्षुद्र आतां' असें तळमळून वाटूं लागतें. सर्व सुवर्णाचे अलंकार मोडून त्यांचें पुन्हां सोनेंच करावें, त्याप्रमाणें आपण गवतें, झाडें, झुडपें, पशुपक्षी, माणसें सर्वांचेच विविध आकार आपल्याच मनानें मोडून सर्व दृश्य सृष्टीचा एक प्रकृतीचा निराकार निर्गुण गोळा आपल्याच कल्पनेंत तयार करतों व त्यामागें जणूं काय निराकार निर्गुण एकच चैतन्य प्रवाह वाहात आहे अशी आपल्या मनबुद्धीस शिकवणूक देऊं लागतों.

परब्रह्माचें स्वरूप बघण्याची ही आपली पूर्वतयारीच असते. ज्यांत आपल्या सर्व पूर्वस्मृति दडलेल्या आहेत असा तो भूतकाल व ज्यांत आपण आपलीं गोड गुलाबी स्वप्नें साकार होतील अशी आशा पालवीत असतों असा तो रम्य भविष्यकाल–हे दोन्हीहि काल चालू वर्तमानांत विलीन होतात व कल्पकतेची सर्व भरारी बोथटून जाऊन–आपण एका अमर्त्य–सतत तीच स्थिति असलेल्या अनुभवाकडे झपाट्यानें जाऊं लागतों. सर्व जग आपल्या ठिकाणीं पूर्णविरामाप्रत पोहोंचतें व अशा स्थितींत–एका महान् गोल गोल फिरणाऱ्या उत्क्रान्तीच्या "Jiant Wheel" वरून एकाएकीं आपणच एकटे खालीं

उतरलों असें वाटते व सर्व ब्रह्मांडे (म्हणजे जितकी जितकी म्हणून परमेश्वराची निर्मिति आहे तितकी) आपणापासून एकदम अलग होतात व 'जें झालेंचि नाहींरे त्याची वार्ता काय पुससी' म्हणून आपल्या शिष्याला छातीठोक जबाब देणाऱ्या श्रीरामदासस्वामीसारखी आपल्या अस्तित्वानें त्रिभुवनाचा केवळ भास निर्माण करणाऱ्या—त्या निराकार, निर्गुण, अव्यय, अखंड, कधींही न जन्मलेल्या कालातीत परब्रह्माचें आपणांस दर्शन होतें.

## माहेरघरीं आल्याचा आनंद

जडाला म्हणजे शरीराला आणि आकाराला आपण बद्ध असल्यामुळें या निराकार, निर्गुण, कालातीत स्वरूपांत परब्रह्म आपणांस फार वेळ ठेवीत नाहीं. किंबहुना आपणच फार वेळ त्या स्थितींत राहूं शकत नाहीं. परंतु त्या तेवढ्या थोड्याशा वेळांत आपल्यामध्यें मात्र जमीनअस्मानचा फरक होतो. आपल्या शरीरांतील अणुरेणूंना नसानसांना—विचारांना—कल्पनांना—बुद्धीला आपलें माहेरघर नजरेस पडल्याचा दिव्य आनंद होतो. ज्या ठिकाणीं गेल्यावर जन्ममृत्यु नाहीं—ज्या ठिकाणीं भूत-भविष्य-वर्तमान यांचेकडून कढईंत टाकलेल्या पदार्थासारखें आपलें तळण होत नाहीं—ज्या पूर्ण सत्य व आनंद यांची सतत अनुभूति येते—असें, तें दिव्य ठिकाण एकदांच पाहिल्यावर 'यद् ज्ञात्वा कश्चिद् विज्ञानुमेव न विद्यते' किंवा 'भिद्यन्ते हृदय ग्रंथी छिद्यन्ते सर्व संशयः' असें ज्याचें गीतेंत वर्णन केलें आहे, अशी स्थिति प्राप्त होते व नंतर निराकारांतून झपाझप बाहेर पडलेले व सतत बाहेर पडत असलेले सर्व कोडो जडअजड सृष्टींतील आकार चैतन्यानें कसे नटलेले आहेत व सर्व ब्रह्मांडें चैतन्यामुळें कशीं अतीव सुंदरतेनें बहरलेलीं आहेत हें कळूं लागतें. आपण या जगतांत चैतन्यजड लग्नसमारंभासाठीं निमंत्रित पाहुणे म्हणून आलों आहोंत व हा आपला जीवनसमारंभ सर्व बाजूंनीं अगदीं फळाला आला आहे, असा अनुभव येऊन आपला मनबुद्धीचा प्रान्त अगदीं समृद्ध होऊन जातो व ती आदिमायाच पुन्हा शृंगार केलेल्या नवोढा तरुणीसारखी हावभाव करून आपल्याला सतत सुखवूं लागते. परंतु आतां तिच्या या सौंदर्यांत अशी कांहीं अनुपमता येते कीं, तिच्याशीं रत होतांना अमृतमय चैतन्यानें आपलें शरीर, मन, बुद्धि हे अवयव पूर्णपणें, दिव्यत्वानें भरभरून येतात व 'कणाकणामध्यें नाचते चैतन्य'—'सांगतसे धन्य जन्म तुझा' अशी अवर्णनीय अवस्था प्राप्त होते. सारांश, आदिमाया ही चैतन्याचीच दुसरी बाजू असून तिचें स्वरूप पूर्ण चैतन्यानुभव घेतल्यावरच पूर्णपणें कळतें, तोंपर्यंत नाहीं.

## वसुदेवांची संभ्रमावस्था

चैतन्याचीच दुसरी बाजू अशी ही आदिमाया—कुमारिकेचें सुंदर रूप घेऊन जगन्माता यशोदेच्या कुशींत मनमोहन चळवळ करीत आहे हें पाहतांच—श्रीकृष्ण प्रभूंना बाहूंत घेतलेल्या वसुदेवाच्या ठिकाणीं एकदम संभ्रम निर्माण झाला. श्रीकृष्णाचेंच दुसरें तितकेंच गोंडस व सुंदर पण स्त्रीरूप त्याला त्या बालकाचे ठिकाणीं दिसूं लागलें. एका क्षणार्धांतच जवळ जवळ नकळतच त्यानें श्रीकृष्ण प्रभूंना यशोदामाईच्या शेजारीं ठेवलें

व त्या बालकाला उचलून घेऊन तितक्याच प्रेमानें तो त्याला कवटाळूं लागला व एकामागून अशी सारखी त्याची प्रेम विव्हलतेनें चुंबनें घेऊं लागला. त्या बालकाच्या मृदु गोंडस व सुकुमार अवयवाचा स्पर्श होतांच वसुदेवाच्या डोळ्यावर अशी कांहीं एक विलक्षण झापड आली कीं त्यास एकाएकीं वाटूं लागलें कीं, मी वसुदेव–माझी स्त्री देवकी व आमचे दोघांचें हें सुंदर बालक–हें दुष्ट कंसापासून कोठें लपवूं–कोठें दडवून ठेऊं ? याला पाताळांत दडवून ठेऊं कीं आत्तांच्या आत्तां स्वर्गांत उड्डाण करून नन्दनवनांतल्या एका दूरच्या राजवाड्यांत याला घेऊन जाऊं. याच्या नखाला सुद्धा कांहीं इजा झाल्यास आपलें हृदय विदीर्ण होऊन त्याचे शतशः तुकडे होतील. आतां काय करूं कीं देवकीचें हें बालक देवकीच्या स्वाधीन करूं–ती त्याचं आपल्यापेक्षां दक्षतेने व प्रेमानें संरक्षण करील. छे, हें बालक जर आपणांपासून कोणी हिराहून घेतलं–तर मग जगण्यांत तरी काय अर्थ आहे ? वसुदेवाची ही विसंभ्रम अवस्था पाहून यशोदेजवळ ठेवलेलें तें गोंडस परब्रह्म साकार स्वरूप, गंमतीनें दोन्ही हात व पाय वर करून व आपले विशाल नेत्र वसुदेवाकडे लावून गोल खळग्या पडलेल्या गालांची मजेदार हालचाल करून खदखदां हासूं लागलें. पण वसुदेवाचें तिकडे लक्षच नव्हतें. तो आपल्याच सुखदायी संभ्रमांत चिंतातुर मुद्रेनें खडतर भविष्याचा विचार करीत उभा होता. परंतु या स्थितींत या ठिकाणीं फार वेळ घालविणें बरें नाहीं असें वाटल्यामुळें कीं काय, कीं देवकीला हें बालक कधीं एकदां दाखवितों अशा तीव्र उत्सुकतेमुळें म्हणा, पण वसुदेव एकदम तीरासारखा तेथून उलटून कंसाच्या बंदिखान्याकडे झपाझप पाऊलें टाकीत परतला.

## आदिमायेचें कारागृहांत आगमन

आतां जगांतल्या सर्व सुंदर व सुखदायी स्वप्नांचा ठेवा त्याला आपल्या नाजुक स्त्रीहस्तांनीं बिलगला होता. कंसानें आतांपर्यंत क्रूरपणानें जन्मतःच मारलेल्या आपल्या सात बालकांचे निष्पाप चेहरे एका मागून एक त्याच्या नजरेसमोरून सरकत होते. त्या भीषण भूतकाळच्या स्मृति त्याला एक सारख्या भेडसावीत होत्या. तर ज्याच्या केवल स्पर्शनानें सर्व जीवनांचा विलक्षण मोह आपल्या ठिकाणीं निर्माण झाला, त्या ह्या क्षणार्धात 'जीव कीं प्राण ' झालेल्या बालकाला कांहीं झालें तरी वाचवावयाचेंच, असा भविष्यकालचा निश्चयात्मक संकेत–त्यास धीर देऊन झपाझप पाऊलें टाकावयास लावीत होता. याच अवस्थेंत तो बंदिखान्यांत शिरून परत देवकीच्या शेजारीं कधीं येऊन उभा राहिला, हें त्याचें त्यालाच कळलें नाहीं. देवकी मातेनें त्या बालकाकडे एक क्षणमात्रच पाहिलें व आदिप्रभु व आदिमाया–या एकाच नाण्याच्या दोन्हीं बाजू असल्यात–त्याप्रमाणें जुळ्या बालकांसारख्या तिला वाटून–तिनें आदीमायेला वसुदेवाच्या बाहूंतून घेऊन कडकडून मिठी मारली व जणुं काय, श्यामला, मोहना, तूं दुसऱ्या स्वरूपांत येऊन मला पुन्हां भेटलास ना– अशा तऱ्हेचे मनांत विचार करीत असतांच–मोहमायेनें अतिशय भारले गेल्यामुळें त्या स्थितींत तिला क्षणार्धांत गाढ निद्रा लागली. वसुदेवसुद्धां फार थकल्यामुळें म्लान चेहरा करून देवकी शेजारींच बंदिखान्यांत झोपी गेला. ( पुढें चालू )

# उथळ पाण्याला खळखळाट फार !

**पुस्तक ही चीज अशी आहे कीं, एकदां ती हातावेगळी झाली म्हणजे आपण त्यास कायमचे अंतरलों म्हणून समजावें. त्याची अपेक्षाच करूं नये. ती करणाऱ्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. पुस्तक हातचें जाऊनही शहाणपणाचे धडे शिकावे लागतात.**

"मी स्वतःचीं पुस्तकें घरीं नेऊन वाचण्यासाठीं कधींही कोणाला देत नाहीं. फार वाईट अनुभव घेऊन चुकलों आहें मी त्याबाबतींत; परंतु आपला अत्याग्रह व आपले व माझे जिव्हाळ्याचे संबंध लक्षांत घेऊन मी हें माझें आवडतें पुस्तक तुम्हांला वाचण्यासाठीं देत आहें. मी माझ्या पुस्तकांना जिवाच्या जतनेनें जपत असतों. तें जराही चुरूं नये किंवा त्याला डाग लागूं नये यासाठीं मी जास्तींत जास्त खबरदारी घेत असतों. तसेच तुम्हींही जपा म्हणजे झालें.' परगांवाहून आलेल्या आपल्या एका मित्राच्या हातीं एक पुस्तक सोपवीत असतां शेखरनें हें उद्गार काढले.

'अहो राव ! जणूं काय आपली सारी संपत्ति व मौल्यवान् खजिना मला आपण देत आहांत ! एका पुस्तकावर किती हा लोभ ! परंतु ठीक आहे. कांहीं काळजी करूं नका ! अवघ्या दोन दिवसांत हें पुस्तक जसें आहे त्या स्थितींत तुमच्या हातीं येईल म्हणजे तर झालें ना ?'

× × ×

कांहीं दिवस लोटल्यानंतर कोणी एक गृहस्थ शेखरच्या घरीं आले व डागाळलेलें, जरा जीर्ण झालेलें व पानें सुटलेलें एक पुस्तक त्याच्या हातीं देऊन म्हणाले, "आपले मित्र आपल्या गांवीं जाण्यापूर्वी आमच्याकडे घाईघाईनें आले व हें फाटकें तुटकें पुस्तक घरीं ठेऊन गेले. आपला पत्ता देऊन तें आपणास पोहोंचतें करण्याची विनंती केल्यावरून मी तें घेऊन आपल्याकडे आलों आहे. बरेच दिवस तें पुस्तक आमच्या घरीं धूळ खात पडून होतें. आज इकडे येण्यास मला वेळ मिळाला. उशीर झाल्याबद्दल क्षमा करा हं !"

शेखरनें तें पुस्तक हातीं घेऊन उलथूनपालथून व निरखून पाहिलें. आपल्या एका आवडत्या पुस्तकाची ती दैन्यावस्था पाहून त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें. त्याच्यानें त्या मित्रास पत्र लिहिल्याशिवाय रहावेना. त्यानें लिहिलें कीं, 'माझ्या आवडत्या पुस्तकाची तुम्हीं करून टाकलेली दुर्दशा पाहून मला अतोनात दुःख झालें. काय लिहावें हेंच समजत नाहीं. किती तळमळीनें पुस्तकाची काळजी घेण्याबद्दल मी सांगितलें होतें तुम्हांला ! काय झाला उपयोग त्याचा ? आपण दिलेलें वचन पाळलें नाहीं. कोणीही एकदांच फसतो. पुस्तकांच्या बाबतींत मात्र

माझी अनेकवार फसवणूक झाली आहे. आपण तर कमाल करून सोडली ! यापुढें मी जास्तींत जास्त सावधगिरीनें वागावें व पुस्तकांच्या बाबतींत कोणावरही विश्वास टाकूं नये, याचा आपण चांगला धडा शिकविला. तो धडा मी केव्हांहि विसरणार नाहीं. त्याबद्दल मी आपणास शतशः धन्यवाद देतों.'

× × ×

त्या मित्राकडून कांहीं दिवसांनीं या पत्राचें पुढीलप्रमाणें उत्तर आलें :

'आपण कोणत्या पातळीवर आहांत त्याचा बरोबर पत्ता मला आपल्या पत्रामुळें लागला. यत्किंचित पुस्तकासाठीं आपला जीव इतका खालवर होईल असें मला वाटलें नव्हतें. त्याची कल्पना असती तर मी आपल्या पुस्तकावर थुंकलोंहि नसतों ! त्या पुस्तकासाठीं एवढें लिहिण्याची कांहीं जरूरी होती का ? समजलों मी. आपणास माझ्याकडून त्या पुस्तकाची किंमत उपटायची आहे ! खरें कीं नाहीं ? मग घ्या. उद्यांच आपल्या नांवें मी मनिऑर्डर करीत आहें. तिचा स्वीकार करून नवें पुस्तक खरेदी करा म्हणजे झालें !

मानसिकशास्त्राच्या दृष्टीनें आपण थोडासा विचार केला तर तशा प्रकारचें पत्र मला आपण केव्हांही लिहिण्याच्या भानगडींत पडलां नसतां. मी आपल्याकडून पुस्तक घेऊन गेलों तें कशासाठीं ? पूजाअर्चा करून बांधून ठेवण्यासाठीं नव्हे, तर सवडीनुसार वाचण्यासाठीं ! वाचीत असतां त्याचीं पानें निखळलीं असतील किंवा अधून मधून त्यावर डागही पडले असतील ! त्यामुळें बिघडलें काय ? कोणतें संकट ओढवलें आपल्यावर ? अहो ! आपला हा देहही एक दिवस जीर्णशीर्ण होणार आहे; मग पुस्तकाचें काय घेऊन बसलां आहांत ! भलत्या अभिमानाच्या भरांत मनाला येईल तें भरकटणें कुठवर रास्त आहे, त्याचा विचार आपणच करावा. सुज्ञांस अधिक काय लिहायचें ? कृपा करून यापुढें आपण माझ्याशीं कोणताहि व्यवहार करूं नये. पत्राचें उत्तर पाठविण्याचीहि जरूरी नाहीं. तुमच्यासारख्याकडून पुन्हां अपमान करून घेण्याची माझी इच्छा नाहीं !'

× × ×

हें पत्र वाचून शेखर स्तंभित झाला. 'चोरावर मोर ! अपराध करूनहि पुन्हां मला धडे शिकविण्याचा शिष्टपणा ! काय म्हणावें याला ? अशा पत्राला उत्तर हें लिहिलेंच पाहिजे. त्याशिवाय डोळ्यांत अंजन कसें पडावें ?'

शेखरनें पुढीलप्रमाणें पत्रोत्तर लिहून पाठविलें—'आपलें कृपापत्र मिळालें ! त्याबद्दल धन्यवाद ! आपण उत्तर न पाठविण्याचा हुकूम सोडला-खरा; परंतु माझ्या मनानें उत्तर लिहिण्याचा आदेश दिला. उत्तर लिहिल्याशिवाय रहावेना म्हणून लिहीत आहें; त्याबद्दल क्षमस्व.

मी यापूर्वी लिहिलेल्या साध्यासुध्या पत्रानें आपल्या अभिमानाला धक्का लागला

याचें मला भारी वाईट वाटलें. त्याबद्दल क्षमा मागण्यासाठीं हें पत्र लिहीत आहें. परंतु तें सरळ पत्र होतें, त्यांत मनाला लावून घेण्यासारखें कांहींएक नव्हतें.

आपली मनीऑर्डर आज आली होती. परंतु आपला किस्सा गिरवून आपण पाठविलेल्या रुपयांवर मी थुंकलों नाहीं. तें पाप माझ्याकडून केव्हांही घडणार नाहीं; मात्र ती मनिऑर्डरें मी साभार परत करीत आहें. तिची कांहींच जरूरी नाहीं.

मनोविज्ञानशास्त्राचा मीही थोडासा अभ्यास केला आहे. त्या शास्त्राच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे मी पहात आहें. त्या बाबतींत माझा निष्कर्ष असा आहे कीं, मनुष्य प्राणी कधींतरी एक दिवस या जगाचा निरोप घेऊन जाणार हें निश्चित असलें तरी तत्पूर्वी वाटेल तसे त्या शरीराला धक्केबुक्के देऊन चालणार नाहीं. जोंपर्यंत जीव आहे तोंपर्यंत त्या शरीराची निगा राखलीच पाहिजे व ती राखणें हें प्रत्येकाचें कर्तव्य असतें. मनुष्याला मरण येतें तें स्वाभाविकपणें यावें. तें अपघातानें किंवा कोणीतरी मारून मुटकून येऊं नये. त्याची जिवंतपणीं नाहक हत्या केली जाऊं नये. हत्या-आत्महत्या करणें महापाप आहे, याची जाणीव आपणांस असेलच. तोच नियम पुस्तकांनाही लावून पहातां येईल. आपण तो जरूर लावून क्षणभर विचार करून पहावा !

त्या पुस्तकांत ज्ञानसंग्रह होता. तें वाचून आत्मसात् करण्यासाठीं आपण माझ्याकडून आग्रहपूर्वक घेऊन गेलां. तें कशासाठीं? कांहींतरी ज्ञानप्राप्ति व्हावी यासाठींच कीं नाहीं ? ज्याच्यापासून आपणास ज्ञानप्राप्ति होते, कांहीं तरी आपण शिकतों, त्याचा आदर करावयाचा, त्याकडे आदराच्या भावनेनें पहावयाचें, हा आपला शिष्टाचार आहे; परंतु आपली मजल तर त्या ग्रंथावर थुंकण्यापर्यंत गेली आहे ! केवढी अवनति आहे ही ! आपलें हें साहस म्हणावयाचें कीं अतिशहाणपण म्हणावयाचा ?

आपल्या त्या पत्रावरून किती तरी गोष्टी मी शिकूं शकलों. त्यापैकीं एक अत्यंत महत्वाचा धडा म्हणजे रागाच्या आवेशांत लिहिलेलें पत्र तसेंच न पाठवितां रागाचा पारा उतरेपर्यंत, डोकें थंड होईपर्यंत थांबून नंतर तें पुन्हां वाचण्यांत यावें. त्यांत फेरबदल करण्याची जरूरी वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. या पत्रासोबत आपलें पत्र मी परत पाठवीत आहें. कृपा करून आपण तें पुन्हां एकवार जरूर वाचावें. आणि पुन्हां दुसरें पत्र पाठविण्याची उपरति झाल्यास पाठवावें. त्याचें माझ्याकडून स्वागतच होईल.

माझ्या पत्रांतून वस्तुस्थितीचें दिग्दर्शन केलें होतें. मनाला लागावें असें त्यांत कांहीं नव्हतें; परंतु आपणास एखादा शब्द किंवा वाक्य लागट वाटलें असल्यास त्याबद्दल मी पुन्हां एकवार क्षमा मागत आहें.’

आपला

**शेखर**

( ‘भारती’ ( हिंदी ) मासिकांतील एका कथेच्या आधारें साभार )

---

# साईबाबा आणि त्यांची शिकवण (२)

**ह. भ. प. श्री दासगणू महाराज यांनीं श्रीसाईबाबांचें चार अध्यायांत ओवीबद्ध चरित्र कथन केलें आहे. त्या क्षेत्रांतील त्यांचा अधिकार फार मोठा आहे. त्याचाच, जरूर वाटेल तेथें निरूपणासह केलेला हा गद्यानुवाद आहे. हा उपक्रम गेल्या अंकापासून सुरू करण्यांत आला आहे. बाबांच्या शिकवणीचें त्यांत सुंदर रीतीनें विशदीकरण झालेलें असून, आमच्या श्रीसाईभक्त वाचकांस हा प्रयत्न आवडेल अशी अपेक्षा आहे.**

**—आप्पाराव**

## पेंडसे पत्नीची आराधना

नारायण कृष्ण पेंडसे या नांवाचे एक गृहस्थ साधुसंतांकडे संशयी दृष्टीनें पहाणारे होते. त्यांनीं श्रीसाईबाबांचे नांव ऐकलें होतें; परंतु सर्वसाधारण लोकांप्रमाणें त्यांची दृष्टि निर्मळ नव्हती. उपेक्षेची व तुच्छतेची होती. त्यांची पत्नी फार भाविक होती. तिनें साई-बाबांच्या गोष्टी ऐकिल्या होत्या. तिला मात्र त्यांच्या दर्शनाची उत्कंठा लागून राहिली होती. कधीं त्यांचें दर्शन घेईन व नेत्रांचें पारणें फेडीन असें तिला वाटत असे. कोणाला सांगायचें ? तिनें आपली अंतरींची इच्छा पतीराजास-पेंडसे यांस सांगितली. ती त्यांना हात जोडून म्हणाली, " माझी इच्छा आपल्याशिवाय कोण बरं पूर्ण करणार ? आपण माझें सर्वस्व; माझें सौभाग्यभांडार ! माझ्या सुखाचे सूर्यनारायण आपणच आहांत. माझी एक विनंती आहे आपल्यापाशीं. पुष्कळांकडून गेल्या कांहीं दिवसांपासून साई-बाबांची कीर्ति मी ऐकत आहें. त्यांचें वास्तव्य शिरडी गांवांत असून दर्शन घेण्यास सर्वतोपरी योग्य असेच ते सत्पुरुष आहेत. आपण त्यांतल्या त्यांत सवड काढून शिरडीला जाऊं. आणि त्या सत्पुरुषाचें दर्शन घेऊन पुण्यपावन होऊं या. मला मोठी उत्कंठा लागून राहिली आहे त्यांच्या दर्शनाची. "

## हें वेड सोडून दे

पत्नीची ही विनंती ऐकून पेंडसे तिला म्हणाले, " कोणी हें भलतेंच वेड तुझ्या डोक्यांत भरविलें ! शिरडी गांवांत ज्याला संत म्हणतां येईल असा कोणीहि नाहीं ! होय; कोणीएक वेड्यापिशाप्रमाणें वागणारा मुसलमान अलिकडे त्या गांवांत आलेला आहे हें मात्र खरें. त्याला कोण संत म्हणेल ? ढोंगी आहे तो ! भोळ्याभाबड्या लोकांना नाहक लुटीत आहे तो ! त्याच्या नादाला लागणारे लोक निव्वळ वेडे आहेत त्याच्याचप्रमाणें ! लोक खरोखर मूर्ख आहेत. त्या ढोंगी बुवाचे त्यांनीं नसते देव्हारे माजवून ठेविले आहेत ! तूं माझें सांगणें ऐक. मी केला आहे त्याचा विचार ! तूं भलतासलता हट्ट धरून बसूं नकोस. समुद्राचें पाणी मुळांतच खारट; त्यांत गोडी व मधूरपणा कुठून बरें येणार ?

मुळांत कांहींतरी असावें लागतें. लोखंडाला पिवळी बेगड लावली म्हणून त्याचें कधीं सोनें होणें शक्य आहे का ? बेगड ती बेगड व सोनें तें सोनें ! अग तो घरोघर पोटासाठीं तुकडे मागतो, ते जमा करतो आणि पोटाची भर करतो, असा तो भणंग भिकारी आहे ! आणि त्याच्या नादाला तूं लागूं पहातेस ? काय म्हणावें तुला हेंच मला समजेनासें झालें आहे.'

अशा रितीनें पेंडसे खूप बडबडले. त्या सत्पुरुषाची त्यांनीं मनसोक्त निंदा केली. परंतु त्या बाईच्या मनावर त्या बोलण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. तिनें ध्यास लावून घेतला होता बाबांच्या दर्शनाचा. तिची दर्शनाची तळमळ फार दांडगी होती. नवरदेव काय वाटेल तें बडबडले तरी तिच्या उत्कंठेवर पाणी पडूं शकलें नाहीं. ती वाढतच गेली. खऱ्या भक्तिभावाचें हें असेंच असतें. कोणी कितीहि बडबड केली तरी दृढ श्रद्धा दुभंगूं शकत नाहीं.

**इच्छा पुरविणारा तोच**

पेणशाच्या पत्नीला बाबांच्या चरणावर कधीं एकदां मस्तक ठेवीन व लागून राहिलेली दर्शनाची तहान भागवीन असें झालें होतें. तुमची इच्छा अत्यंत उत्कट असली म्हणजे देव कोणत्या ना कोणत्या मार्गानें ती पूर्ण करतो. त्याला काळजी असते आपल्या भक्ताची.

एकदां पेणसे आपल्या पत्नीसह प्रवासासाठीं बाहेर पडले. त्यांच्यामागें कांहीं सरकारी कामकाजही होतें. उगाच भटकायला कोण बाहेर पडतो ? फिरत फिरत हें जोडपें शिरडींत आलें. बाबांनींच आणलें त्यांना खेचून म्हणाना. पेणशांचें त्या गांवांत कांहीं सरकारी कामकाज होतें. रहाण्यासवरण्याची सोय लावून पेणसे आपल्या कामानिमित्त बाहेर निघून गेले. त्यांच्या पत्नीला माई म्हणत असत. इकडे माईनें काय केलें ? आपण शिरडींत आलोंच आहोंत. शिरडी म्हणजे बाबांचें गांव. मग त्यांचें दर्शन घेतल्याशिवाय शिरडींतून जायचें ? छे; छे त्यांनीं क्षणार्धांत मनाचा निर्धार केला व बाबांच्या निवासस्थानीं जाऊन भक्तिभावपूर्वक त्यांचें दर्शन घेतलें. साईबाबांच्या पायांवर मस्तक ठेवावें हीं माईची फार दिवसांची तळमळ होती ती एकदांची पूर्ण झाल्यामुळें त्यांना पराकाष्ठेचा आनंद झाला. आज जन्मा आलियाचें सार्थक झालें असें त्यांना वाटूं लागलें. किती आनंद झाला आहे त्या गोष्टीचा त्यांना. तो आनंद पतिराजाला केव्हां एकदां सांगेन व त्यांनाही दर्शन घ्यायला लावून त्या आनंदाचा त्यांना वाटेकरी करीन, असें त्या प्रेमळ पत्नीला वाटूं लागलें.

पतिराज काम संपवून घरीं येतांच त्यांनीं आपण साईबाबांच्या दर्शनास गेल्याचें व त्यामुळें आपणास केवढें मोठें समाधान झालें यांचें रसभरीत वर्णन करून सांगितलें व म्हणाल्या, 'काय हो सांगूं तुम्हांला ! केवढा पुण्यवान् महापुरुष आहे तो ! कां त्यांची उगाच निंदा करतां तुम्हीं ? त्याच्या दर्शनानें मला केवढें तरी समाधान वाटलें, तुम्हींही त्या सत्पुरुषाचें दर्शन घेऊन पुण्यपावन व्हा.'

प्रेमळ बायकोचा अशा रीतीनें झालेला आग्रह. काय करणार ? त्या आग्रहापुढें पेंडशांनीं हात टेकले, आणि केवळ पत्नीच्या आग्रहास्तव ते बाबांच्या दर्शनास गेले एकदांचे. त्यांना पहातांच बाबा मोठ्यानें गर्जना करून व हातीं दगड घेऊन म्हणाले, 'खबरदार कोणी पुढें येईल तर ? येथें कोणी येण्याचें कारण नाहीं. ठेचून टाकीन या दगडानें ! मी ढोंगीबुवा आहें ? माझें दर्शन घेण्याची कांहीं एक जरूर नाहीं. चालते व्हा येथून ! मी हीन दीन आहें. मी वेडापिसा मुसलमान आहे. तुम्हीं उच्चवर्णीय ब्राह्मण कुळांत जन्मलेले. माझें दर्शन घेतल्यास उगाच बाटून जाल. चला ! निघा येथून !!'

**पेणसे उमगले !**

हें बोलणें ऐकून पेणसे मनांतल्या मनांत गारठून गेले ! माझ्या मनांत येऊन गेलेले विचार यांनी कसे जाणले ! हे त्रिकालज्ञ व महाज्ञानी आहेत अशी खूणगांठ त्यांनीं तात्काळ बांधिली. आम्हीं उभयतां आमच्या घरांत कांहीं तरी बोललों तें यांना कसें कळलें ? वारा जसा स्वैरपणें सर्वत्र संचार करतो तसेंच यांचें आहे ! यांचें ज्ञान अगाध आहे. असे नाना प्रकारचे विचार त्यांच्या डोक्यांत येऊं लागले. आपण कल्पना केली होती तसे बाबा नाहींत. ते एक अवलिया थोर संत आहेत. शेवटीं अप्पाशीं वशिला लावून त्यांनीं बाबांचें सांत्वन करविलें तसेंच त्यांना पश्चात्तापही झालेला होताच. अप्पा-मार्फत त्यांनीं शांतपणें बाबांचें दर्शन घेतलें.

**अप्पा कुळकर्णी वरील संकट**

यानंतर कांहीं दिवसांचा काळ लोटला. सगळे दिवस कांहीं सारखे नसतात. कोणाच्या वांट्यास कधीं काय येईल हें सांगतां येणें कठीण असतं; परंतु बाबा तें निश्चितपणें सांगूं शकत असत. एकदां सहज बोलतां बोलतां अप्पा कुळकर्णी यांस ते म्हणाले, 'अरे ! आहेस कुठें ? आज आपल्या गांवांत चोरटे प्रवेश करणार आहेत. या चोरांची तऱ्हा अगदीं जगावेगळी आहे. घरांतील चीजवस्त चोरून नेण्याच्या भरीस ते पडत नाहींत. ऐन मालावर त्यांची दृष्टी खिळलेली असते. तो ऐन माल घेऊन ते पळून जातात; परंतु चोरी करतांना कधीं कुणाला दिसत नाहींत; असे मोठे बिलंदर चोरटे आहेत ते ! आणि सांगण्यासारखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे वेड्या, आज त्यांची पहिली स्वारी होणार आहे ती तुझ्यावर ! तेव्हां लगबगीनें जा; आणि कांहीं ना कांहीं बंदोबस्त करण्याच्या तयारीला लाग !'

बाबांच्या या बोलण्याचा गर्भितार्थ अप्पाला कांहीं कळला नाहीं. त्यानें चोर, दरोडेखोर येतील म्हणून घरावर कांहीं भिल्ल लोकांचा पहारा बसविला; तसेंच गल्लीगल्लींतून जाग घेत व लोकांना जागवित गस्त फिरूं लागली. प्रहरभर रात्र लोटली असेल. इतक्यांत अप्पाला जुलाब आणि वांत्या जोरांत सुरू झाल्या. महामारीची स्वारी होती ती ! दुर्दैवाचा फेरा बिचाऱ्या अप्पाच्या वाट्यांस बाबांनीं म्हटल्याप्रमाणें प्रथम आला ! एकसारख्या वांत्या, जुलाब ! सारें शरिर भरून गेलें. शरिरांत त्राण राहिलें नाहीं. तें गारिगार झालें

शरिराची ठेवण बदलली. नाकही वांकडे झालें. डोळे एकदम खोल गेले. नाड्यांनीं आपली जागा सोडली. अप्पांची ही गलित स्थिति पाहून सारे लोक दुःखी कष्टी झाले. नवऱ्याची ही असहाय्य व हताश स्थिति पाहून बायको अत्यंत घाबरी झाली. तिला काय करावें तें सुचेना. करायचें काय ? जायचें कुठें ? धांवत धांवत बाबाकडे मशिदींत आली. त्यांच्या पायांवर लोटांगण घालून ती धाय मोकलून रडूं लागली व स्फुंदस्फुंदून म्हणाली, ' बाबा ' माझे पतिराज मला सोडून चालले हो ! त्यांची स्थिति ठीक दिसत नाहीं. कांहीं उदी अंगारा द्या. त्यांना उतार पडूं द्या एकदांचा. माझें सौभाग्य राखा. कुणाला जाऊं. शरण तुमच्या शिवाय मी ! तुम्हींच आमचें सर्वस्व. '

## बाबांचा सदुपदेश

अशावेळीं महाराजानीं तिला धीर देऊन जो उपदेश केला आहे तो प्रत्येकानें आपआपल्या अंतःकरणावर कायमचा कोरून ठेवण्यासारखा आहे. बाबा म्हणाले, ' बाळे दुःखीकष्टी होऊं नकोस. या जगांत जो जन्मास आला त्याला कधीं ना कधीं मृत्यु हा यावयाचाच. त्याच्या तावडींतून कोणीही सुटूं शकत नाहीं. जन्म आणि मृत्यु हीं दोन्हीं ईश्वरानें आपल्या हातीं ठेविलीं आहेत. तोच सूत्रचालक व वाटेल तेव्हां कळ दाबणारा आहे. सर्वत्र तोच भरून राहिला आहे. त्याला वेगळा करतां येणार नाहीं. देणारा तोच आणि नेणारा तोच. या जगात कोणी जन्मत नाहीं किंवा कोणी मरतहि नाहीं. हा ईश्वरी खेळ आहे. त्या खेळाकडे ज्ञान्याच्या डोळ्यांनीं पहायला शिकलें पाहिजे. तूं काय, मी काय, किंवा कोणीही काय, सर्व त्याच्या हातचीं बाहुलीं आहोंत, तो नाचवील तसें नाचायचें, त्यानें चला म्हटलें म्हणजे निघून जायचें ! आपल्या अंगांत आपण बंडी घालतों नाहीं का ? ती जुनीपुराणी झाली म्हणून आपण तिला फेकून देतों व दुसरी घेतों. तसाच खेळ आहे या देहाचा. आपलें शरीर हें एक वस्त्र किंवा ही बंडी आहे. प्राणानें, आत्म्यानें त्या शरिराचें स्वतःवर पांघरूण घेतलें आहे. तो प्राण—आत्मा मात्र अक्षय्य अभंग व निर्विकल्प आहे. त्याला कोणीही धक्का लावूं शकत नाहीं. तेव्हां अंगारे धुपारे करण्याच्या भानगडींत तूं बिलकुल पडूं नकोस. वस्त्र फाटलें आहे. आतां त्याला ठिगळें मारीत बसण्यांत कोणता बरें फायदा ? तो जातो आहे ना ? त्याला खुशाल जाऊं दे. त्याच्या आड तूं कां बरें येतेस ? त्याला आपल्या मुक्कामास जाऊं दे. माझ्या आधींच अप्पानीं आपली कफनी बदलण्याची तयारी चालविली आहे. ठीक आहे. तूं तरी त्याच्या आड कशाला येतेस ? अप्पाला आतां सद्गति मिळणार आहे. त्याचें भलें होणार आहे. त्याच्या सुकृतामुळें मोक्षपद त्याच्या हातीं आलें आहे; तेव्हां तो डोळ्यांआड होत आहे तो होऊं दे. त्यांतच त्याच कल्याण आहे.'

## गांवकऱ्यांची विनवणी

अशा रीतीनें अप्पाच्या बायकोची समजूत घालून बाबांनीं तिला घरीं पाठवून दिलें. त्यानंतर थोड्याच वेळानें अप्पा इहलोकींचा मुक्काम संपवून परलोकीं गेला. दुसऱ्या दिवशीं आणखी २।३ इसमांस कॉलऱ्याची बाधा झाली. सारे लोक घाबरून

गेले. या संकटसमयीं काय करावें हें कोणालाही सुचेना. सारा आधार व भरिभार बाबांवर. लोक एकत्र जमून बाबांकडे आले व त्यांना परोपरीनें विनवण्या करून म्हणूं लागले, " बाबा ! आमच्या गांवावर महामारीच्या रूपानें हें मोठेंच संकट ओढवलें आहे, याचा आपण कांहींतरी विचार करा. तुमच्यासारखे सत्पुरुष आमच्या गावांत असून मग त्यांचा काय बरें उपयोग ? हें संकट निवारण करणें आपल्याच हातीं आहे. तारणारे, मारणारे आपणच अहांत; तेव्हां कृपा करून आम्हांला संकटमुक्त करा. "

## सात जणांचे बळी

बाबांनीं सर्वांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें. त्यांना धीर देऊन ते म्हणाले, " आपल्या या शिरडी गांवांतून महामारी सात जणांचे बळी घेणार आहे. या यज्ञांत तेवढ्या आहुति पडल्या म्हणजे ती शांत होईल व गावांतून जाईल. "

बाबांचे शब्द ते ! ते सत्य व्हायचेच. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें बरोबर सात माणसें महामरीला बळी पडलीं. आणि नंतर ती शांत झाली. बाबांचें भाकीत खरें ठरलें व जनतेचा त्यांच्यावरील विश्वास दुणावला.

असे नाना चमत्कार त्याकाळीं शिरडींत घडून येत होते. हे चमत्कार किंवा या लीला वर्णन करून सांगाव्या तेवढ्या थोड्याच. आम्हीं तरी त्यांचें किती म्हणून वर्णन करणार ! परंतु तुमची ऐकण्याची उत्कंठा दांडगी आहे. तेव्हा यानंतर घडलेले आणखी कांहीं चमत्कार सांगतों—

## कोंड्या सुताराची गोष्ट

कोंड्या सुतार या नांवाचा बाबांचा एक परमभक्त होता. मोठा भाविक तसाच श्रद्धाळू. त्याचें सर्वस्व म्हणजे बाबा. अशा भक्तावर बाबांचें प्रेम कां बरं नाहीं असणार ? बाबांना तो अत्यंत आवडता वाटत असे. त्याच्यावर बाबांची विशेष कृपादृष्टि होती. एकदां बाबा त्याला जवळ बोलावून म्हणाले, " अरे हें बघ, आत्तांच्या आत्ता तूं खळवाडीस जा. तेथें गवताच्या गंजी आहेत ना ? त्यांपैकीं मधल्या गंजीला आग लागली आहे. ती लगबगीनें विझवून ये ."

बिचारा कोंड्या घाबराघुबरा झाला. आग लागल्याचें वृत्त कांनी पडतांच तो लगबगीनें धांवत त्या ठिकाणीं गेला. तेथें तपास करतां आग लागल्याची बातमी खोटी असल्याचें त्याला आढळून आलें. तो गेला तसाच धापा टाकीत परत फिरला. राग आला होता त्याला बाबांचा ! कारण भर दुपारच्या वेळीं त्याला धावपळ करावी लागली होती. तो बाबांजवळ जाऊन म्हणाला " बाबा ! कां बरं मला ऐन दुपारच्यावेळीं धांवपळ करायला लावलीत ? मला अशा रीतीनें त्रास देण्यांत तुम्हांला काय बरं सुख वाटलं ? हे बघा ना माझे पाय कसे पोळून गेले आहेत ते ! "

यावर बाबा म्हणाले, ' मी कां बरं खोटं सांगून तुला उगाच त्रास देईन ? मी जें सांगितलें तें खोटें नव्हतें. अजूनही जरा मागें वळून पहा ! तो पहा त्या दिशेनें धूर येत आहे ! एकसारखी गवताच्या गंजीची रांग लागलेली आहे. त्यांपैकीं एका मधल्या

गंजीला आग लागून आतां आगीचा डोंब उठला आहे आणि सारा गांव त्यामुळें हवालदिल झालेला आहे. सारी खळवाडी पेटून भस्म होते कीं काय अशी लोकांना धास्ती वाटूं लागली आहे.'

## बाबांनीं संकटमुक्त केलें !

आणि बाबांनीं सांगितलेलें अक्षरशः खरें होतें. ते दिवस होते उन्हाळ्याचे. त्यांत वेळ पडली दुपारची ! वारा सुटला होता सोसाट्याचा ! जणुं काय प्रलयकाळ आला असें सर्व लोकांना वाटूं लागलें. अरिष्टावर अरिष्ट ! भर पडत गेली एकसारखी ! झाडें पेटून कडकडून खालीं कोसळूं लागलीं. घरांचीं छप्परें सोसाट्याच्या वाऱ्यामुळें आकाशांत उडूं लागलीं. वावटळ म्हणजे ती कांहीं साधारणशी नव्हती. अशा परिस्थितींत आग आटोक्यांत आणणेंहि महाकठीण गोष्ट होती. त्या भागांतील लोकांवर मोठा कठीण प्रसंग ओढवला होता.

साऱ्या लोकांची भीतीनें गाळण उडाली. संकटसमयीं बाबाकडे धांव घ्यायची, त्यांना दया यायची व त्यांनीं सर्वांच्या कल्याणासाठीं कांहीं ना कांहीं तोड काढून लोकांना संकटमुक्त करायचें. बाबांकडे येऊन सर्वांनीं त्यांचे पाय धरले. पायांना घट्ट मिठी मारून लोक ओक्साबोक्सीं रडूं लागले. ते म्हणाले, 'बाबा ! आमच्या खळवाडीस आगीनें ग्रासून टाकिलें आहे. आमची शेतीवाडी, घरें दारें, गुरें ढोरें सारें कांहीं तेथें आहे. तें सर्व भस्मसात् झाल्यावर आम्हीं जायचें कुठें आणि कोणाच्या तोंडाकडे पहायचें ? खळवाडी म्हणजे आमचें प्राणसर्वस्व. आमचें सारें जीवन त्या वाडीवर विसंबून आहे. अग्निनारायणानें तिचें भस्म करून टाकल्यावर आम्हीं करायचें काय ? आमची अन्नान्नदशा होईल. आमचीं मुलें माणसें मरतील. चाऱ्याच्या अभावीं आमच्या गुराढोरांचीही गत तीच होईल तुम्हीं या संकट प्रसंगीं नाहीं धांवून यायचें तर दुसरा कोण बरें येणार ? तुम्हीं प्रत्यक्ष परमेश्वर अहांत, तुमच्याशिवाय कोण बरें आमचें रक्षण करणार ! भूतभविष्य सारें तुम्हीं जाणतां. सारी चावी तुमच्याहातीं आहे. या संकट प्रसंगीं कांहीं तरी उपाययोजना करा व आमची सुटका करा एकदांची !'

बाबा म्हणजे दयेचा सागर. तें रडणें, त्या दीनवाणीनें केलेल्या विनवण्या व त्या आर्त हांका ऐकून बाबा कळवळले. त्या लोकांना बरोबर घेऊन बाबा तसेच खळवाडीस गेले. गंजी पेटत होती. ती आग कुठवर पोहोंचली असती हें सांगतां येणें कठीण आहे. भयंकर भडका उडून जाण्याची ती वेळ होती. पेटणारी गंजी बाबांनीं ताबडतोब हुडकून काढली व तिच्या सभोंवार पाण्याचें वर्तुळ काढून तिला बंधन घालून टाकलें. काय छाती लागली आहे आगीची त्या सीमारेषेबाहेर पसरण्याची ! आग जागच्याजागीं थबकली ! बाबा म्हणाले, 'ही एवढीच गंजी जळेल. दुसरीला बिलकुल धक्का लागणार नाहीं. मात्र ही आग विझविण्याचा आतां प्रयत्न करूं नका.'

**पंचमहाभूतांवर ताबा**

बाबांनीं जसें म्हटलें तसेंच घडलें. बाबांच्या कृपेनें हें संकट टळल्याबद्दल किती आनंद झाला आहे त्या भागांतील साऱ्या लोकांना ! बाबांची महति अशा रीतीनें वेळोवेळीं लोकांच्या प्रत्ययास येत होती. गवताच्या साऱ्या गंजीच नव्हे तर त्या भागांतील साऱ्या घरादारांची व चीजवस्तूंची राखरांगोळी होऊन जावयाची; ती टळली बाबांच्या कृपेनें. बाबांनीं अग्निनारायणावर आपला अंमल चालविला. सत्पुरुषांचें महात्म्यच तसें असतें. सारीं पंचमहाभूतें त्यांच्या आज्ञेंत वावरत असतात. त्यांच्या हुकुमाबाहेर त्यांना जरासुद्धां हालचाल करतां येत नाहीं. बरोबरच आहे. प्रत्यक्ष भगवंत त्यांच्या सेवेसाठीं जेथें सदासर्वकाळ तिष्ठत उभा असतो, तेथें इतरांची काय कथा !

सायंकाळची वेळ झालेली होती. सारे लोक संकट टळल्यामुळें आनंदभरित झाले होते. ते बाबांना धन्यवाद देण्यासाठीं आले तेव्हां या प्रसंगाच्या निमित्तानें त्यावेळीं बाबानीं जो सदुपदेश केला तो खरोखर बहुमोल होता. (पुढील अंकीं)

---

आपण सर्वजण दिव्याबत्त्यांप्रमाणें आहोंत. आमचें जीवनही त्या दिव्याची ज्योत आहे. तो दिवा पेटता रहायला ऑक्सिजन लागतो. तो सांठा संपला म्हणजे दिवा मालवतो. मग आपण काय करूं शकतों ? तो दिवा सदासर्वकाळ धुवून पुसून स्वच्छ, निर्मळ ठेवायचा.

— स्वामी विवेकानंद

---

MATUNGA CLEANING WORKS
ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN
MODI NIWAS, BOMBAY 19
Washers, Dyers and Dry Cleaners.
A Pleasure to You—A Satisfaction to Us
Chemical Cleaners, Super Fine Darners
Master Dyers
*FOR*
Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths
सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार
माटुंगा क्लीनिंग वर्क्स
स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस. व्ही. प्रधान

# निमकरोली बाबा !

**जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति ! त्याचप्रमाणें सत्पुरुषांतहि भिन्न प्रवृत्ति, तसेंच भिन्न वागणें, सवरणें आढळून येतें. एकाचा मेळ दुसऱ्याला नाहीं. श्री. के. एम्. मुनशी यांनीं आपणांस भेटलेल्या एका सत्पुरुषाची माहिती मनोवेधक रीतीनें करून दिली आहे.**

सुप्रसिद्ध कायदेपंडित व राज्यपाल, गृहमंत्री, अन्नमंत्री यासारख्या बहुमानाच्या जागा विभूषित केलेले श्री. के. एम्. मुनशी यांना कोण ओळखत नाहीं ? त्यांची हिंदु संस्कृति व हिंदुधर्म यासंबंधींची भावना अत्यंत जाज्वल्य व प्रखर आहे. एकदां ते मसुरी येथें हवापालट करण्यासाठीं गेले होते. 'सिव्हाय' नामक विश्रांतिगृहांत उतरले होते. तेथील एका मित्रानें चहापानाचें आमंत्रण दिल्यावरून तें स्वीकारून ते विश्रांती-गृहाकडे जाण्यासाठीं बाहेर पडले. तिकडे वळण्याचे रस्ते दोन आहेत. त्यांपैकीं एका रस्त्यानें जाण्याचें योजून मुनशीजी मार्गास लागले. अर्ध्या अंतरावर गेले असतील नसतील तोंच वाटेंत त्यांना एक वयोवृद्ध गृहस्थ भेटले. रस्त्याच्या बाजूला बोट दाखवून ते म्हणाले, "पहा बरें, त्या ब्लँकेटच्या ढिगाऱ्यांतील ते बुवाजी जवळच असलेल्या आमच्या बंगल्यांत जाऊन बसायला तयार नाहींत ! तिथेंच पडून रहाणार म्हणून हट्ट धरून बसले आहेत. तुम्हीं तरी सांगा त्यांना !"

### ब्लँकेटचा ढिगारा

मुनशीजींनीं जवळ जाऊन पाहिलें तों एक ब्लँकेटचा ढिगारा ! त्याच्याखालीं कोणी तरी आजारी माणूस असावा अशी त्यांनीं कल्पना केली.

"कोण आहे तें !" मुनशीजी चौकशी करूं लागले.

"माझ्या मुलाच्या बंगल्यांत ते चौकशीसाठीं आले होते. तेथून एकाएकीं त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक ! या ठिकाणीं रस्त्याच्या बाजूला अर्धा तास झाला, असे पडून आहेत, किती सांगितलें तरी ऐकत नाहींत." वृद्ध गृहस्थ म्हणाले.

इतक्यांत तो ढिगारा हालूं लागला. व ब्लँकेटमधून एक दाढीवाला चेहरा हळूच बाहेर आलेला दिसूं लागला.

'कोण ? मुनशी ? तुम्हीं या ठिकाणीं कसे ?' तो चेहरा बोलूं लागला.

'मीं तो चेहरा निरखून पाहिला. ओळख पटली. 'निमकरोली बाबा !' तुम्हीं इथें कसे ?' मी आश्चर्यानें थक होऊन विचारलें.

× × ×

## तें नांव कसें मिळालें ?

हे निमकरोली बाबा मनास येईल तिकडे सतत भटकत असतात. सतत एका जागीं कधीं रहावयाचे नाहींत. त्यांचा सारा पोषाख म्हणजे एक ब्लँकेट ! ते बहुतेक वेळां नैनितालला जातात व तेथील हनुमान गढींत रहातात. ते कुठून येतात आणि कुठे व केव्हां निघून जाणार हें कधीं कुणाला समजत नाहीं. कोणाशीं सहसा बोलायचे नाहींत. हासभास नसतां एकाएकीं एखाद्या ठिकाणीं येतील व एकाएकीं निघून जातील. त्यांची ही नेहमींची वृत्ति. त्यांचें नांव काय, गांव कोणता, हें कोणालाही माहीत नाहीं.

मग ' निमकरोली बाबा ' हें नांव तरी त्यांना कसें मिळालें ? त्याचा इतिहास मोठा गमतीदार आहे. फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एकदां निमकरोली स्टेशनांत एक आगगाडी थांबली. डब्यांत तिकीट चेकर शिरला व तिकीटें तपासूं लागला. त्या डब्यांत हे ब्लँकेटवाले बुवाजी होते. ' तिकीट बताव ?' जवळ तिकीट नव्हतें. मग बतावणार कुठून !

त्या. चेकरनें त्या बुवाजीस डब्याबाहेर काढिलें. काय करणार ? बिचारे बुवाजी प्लॅटफॉर्मवर स्वस्थ पडून राहिले; स्वतःशींच पुटपुटले—' ही गाडी या स्टेशनांतून कशी बाहेर पडते पाहूं या ! '

## आगगाडी थबकली !

गाडी जागच्या जागीं थबकली. गार्डानें शीळ फुंकली. परंतु गाडी कांहीं केल्या हालेना. सिग्नल देण्यांत आला. गाडी जागच्या जागीं. इंजीन व रस्ता तपासून पहाण्यांत आला. कांहीं बिघडाबिघड झालेली नव्हती. ब्लँकेटबुवांचें प्रकरण बिघडलें होतें ! परंतु तें लक्षांत यायला बराच वेळ जावा लागला.

उतारूंपैकीं कोणीतरी स्टेशनमास्तरकडे जाऊन सांगितलें कीं, त्या ब्लँकेटबुवांना डब्यांतून खालीं उतरविलें आहे ना ! त्यांचाच हा प्रताप ! त्यांना सन्मानपूर्वक परत डब्यांत नेऊन बसवीपर्यंत तुम्हीं कितीहि प्रयास केलेत तरी ही गाडी जागची कांहीं केल्या हलणार नाहीं !

आतां कुठें रेल्वे अधिकाऱ्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. स्टेशन मास्तर, तो तिकीट चेकर आणि इतर सारे संबंधित अधिकारी बाबा पहुडले होते त्या ठिकाणीं आले व त्यांना हात जोडून म्हणाले, ' महाराज ! आपण गाडींत बसा, आम्हीं चुकलों. क्षमा करा. तुम्हांला तिकिट कोणीही विचारणार नाहीं ! बाबा कांहीं न बोलतां डब्यांत जाऊन बसले आणि लागलीच गाडी वेगानें सुरू झाली.

असे आहेत हे बाबा ! त्या दिवसापासून सारे लोक त्यांना ' निमकरोली बाबा ' या नांवानें ओळखूं लागले.

## दांडगी स्मरणशक्ति

या बाबांची स्मरणशक्ति फार दांडगी आहे. एकदां ओळख झालेल्या माणसास ते केव्हांही विसरत नाहींत. कधीं काळीं भेट झाल्यास त्यांची व त्याच्या घरांतील माणसांची विचारपूस केल्याशिवाय रहाणार नाहींत.

परंतु त्यांचे बोलण्या चालण्याचे व वागण्या सवरण्याचे मार्ग मात्र जगावेगळे व विचित्र आहेत. रस्त्यानें जाऊं लागले म्हणजे त्यांच्या मर्जीस येईल त्याच माणसास जवळ बोलावून म्हणतील, तुझ्या बाबतींत अशी अशी घटना घडून येणार आहे ! यापेक्षां जास्त कांहीं न बोलतां पुढें चालूं लागतील. तें म्हणतील तें खरें ठरावयाचेंच. मला निदान १०।१२ लोकांनीं या संबंधीं निश्चितपणें सांगितलें.

## कांहीं स्वीकारणार नाहींत

बरें, तुम्हीं सद्भावनेनें त्यांना आपल्या घरीं आदरसत्कारासाठीं किंवा कोणत्याही हेतूनें बोलावलें तरी ते येणार नाहींत व तुमच्याकडून कांहींही स्वीकारणार नाहींत. कोणाकडे जायचें हें ठरविणारे तेच, तुम्हीं नाहीं ! त्यांना बोलावेंसें किंवा कांहीं सांगावेंसें वाटेल, त्याच्याशींच ते आपण होऊन बोलतील. तुम्हीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर तुम्हांला मिळणार नाहीं.

१९५१ सालची गोष्ट. तेव्हांपासून मी त्यांना ओळखूं लागलों. संयुक्तप्रांताच्या राज्यपालाचे सहकारी चिटणीस श्री. पांडे यांच्या बंगल्यावर एकदां ते गेले आणि त्यांना म्हणाले, सर होमी मोदींनंतर तुमच्या प्रांताचे राज्यपाल मुनशीजी होणार आहेत.

राज्यपाल होण्याचें माझ्या ध्यानींमनींही नव्हतें. ती जागा स्वीकारण्यास मी योग्य आहे असें मला वाटत नव्हतें व पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याही पुढें त्यावेळीं माझें नांव नव्हतें !

## नैनिताल बंगल्यांतील भेट

संयुक्त प्रांतांत गेल्यानंतर मला हें समजलें व बाबाच्या आश्चर्यकारक सामर्थ्याच्या नानाविध गोष्टी माझ्या कानावर आल्या. त्यांची भेट घेण्याची बलवत्तर इच्छा माझ्या मनांत जागृत झाली होती.

एकदा नैनिताल येथील राज्यपाल बंगल्यांत माझे वास्तव्य असतां ते तेथील हनुमान गढीवर आल्याचें मला समजलें. कुटुंबांतील मंडळीसह मी त्यांच्या भेटीस गेलों व त्यांना वंदन केलें. त्यांनीं सर्वांची अगत्यपूर्वक चौकशी केली व आम्हां सर्वांशीं ते थोडा वेळ बोलले.

त्यानंतर एक वर्षानें पुन्हां आम्हीं उन्हाळ्यांत नैनीतालच्या बंगल्यांत रहात असतां एकाएकी बाबांनीं बंगल्यांत प्रवेश केला. सर्वांची चौकशी केली. एक प्यालाभर दूध घेतलें व निघून गेले.

यानंतरच्या आणखी एका उन्हाळ्यांत आम्हीं नैनीताल येथें असतां बाबांच्या आगमनाची बातमी समजल्यावरून आम्हीं त्यांच्या भेटीस गेलों. तेव्हां तेथील मंडळी-कडून आम्हांला समजून आलें कीं, ‘ थोड्याच वेळांत मुनशी येथें येतील ’ असें जवळ-पासच्या लोकांजवळ ते बोलले होते.

× × ×

## बाबांची आकस्मिक भेट

असा आहे या निमकरोळी बाबांचा इतिहास. मसुरी येथें रस्त्याच्या बाजूस ब्लँकेट-मध्यें गुंडाळून घेतलेलें मी त्यांना पाहिलें तेव्हां हा सारा इतिहास माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला. मी आश्चर्यानें थक्क झालों!

'बाबा! येथें आलां कधीं तुम्हीं?' मी चौकशी केली.

'तें बोलूं या मागाहून! तुम्हीं तुमचें फिरणें आटोपून या पाहूं!' बाबा म्हणाले.

'मी जाऊन येतों परंतु तुम्ही अगोदर त्या बंगल्यांत जाऊन बसा. मी थोड्या वेळानें येतों तेथेंच!'

कांहीं न बोलतां बाबा ब्लँकेटसह तेथून उठले आणि त्यांनी बंगल्याचा मार्ग धरला व मी माझ्या वाटेनें पुढें गेलों.

मला मागाहून समजलें कीं, त्या बंगल्यांत ते प्रथम आले तेव्हां त्यांनीं माझी चौकशी केली. त्यावरून श्री. त्रिवेदी (बंगल्याचे मालक) यांनीं मी रहात होतों त्या सेव्हॉय हॉटेलमध्य फोन केला असतां मी बाहेर गेल्याचे समजलें. बाबा रस्त्याच्या बाजूला त्याच वेळीं जाऊन पडून राहिले; याचें कारण मी त्या रस्त्यानें जाणार असल्याचा अंदाज त्यांनी केला असावा आणि तसा प्रकार नसता घडला तर त्यांची व माझी भेट झाली नसती.

## मुंबईला येईन कधींतरी!

नंतर मी त्रिवेदी यांच्या बंगल्यांत गेलों व बाबांना भेटलों. त्यांनीं आमच्या घरांतील साऱ्या माणसांची चौकशी केली व मध्येंच विचारलें, 'मुनशी! तुम्हीं मागें एक मंदिर बांधणार म्हणालां होतां तें बांधलें का?'

'होय; अलिकडेच बांधून झालें.' मी उत्तरलों.

'मी येईन बरं कधीं तरी तें पहायला!'

'परंतु तुम्हीं मुंबईत येणार हें मला कसं बरं समजणार?'

'त्याची नको तुम्हांला काळजी! मी येईन हें नक्की!'

'त्यानंतर आम्हीं एकमेकांचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच बाबांनीं मसुरी सोडल्याचें मला समजलें.

('भवान्स जर्नल' च्या आधारें साभार.)



# दोन बड्या भाईंची भेट

**अहंकाराच्या आहारीं जाणें फार वाईट. अहंकार नाहींसा करणारा शेराला सव्वाशेर कोणी तरी भेटतोच आणि शेवटीं तोंडघशीं पाडतो. भीमाचा गर्वपरिहार कसा व कोणी केला?**

पांडव वनवासांत होते त्या काळची गोष्ट आहे ही. घनदाट अरण्यांतील एका आश्रमांत त्यांचें वास्तव्य होतें. तेथील सृष्टी–सौंदर्य काय वर्णावें ! किती सुंदर व सुगंधी फुलें जिकडे तिकडे विखुरलीं होती ! ते झुळझुळ वहाणारे पाण्याचे प्रवाह; ती नटलेली वनराजी ! छे; नाहींच त्या निसर्गरम्य सौंदर्याचें वर्णन करतां यायचें.

## सुगंधी सुंदर पुष्प

अफाट पसरलेली ती निसर्गाची शोभा न्याहळीत एक दिवस द्रौपदी दरवाजाबाहेर बसलेली होती. ती तल्लीन होऊन गेली होती ! किती पाहूं आणि डोळ्याचें पारणें फेडूं असें झालें होतें तिला. तिला वेळेचें भान राहिलें नव्हतें. इतक्यांत तिला जणूं काय भानावर आणण्यासाठीं वाऱ्याच्या झोताबरोबर कुठून तरी एक फूल आलें होतें तें हातांत घेऊन द्रौपदी त्याच्याकडे तल्लीनतेनें पहात व त्याचा सुगंध प्राशन करीत कितीतरी वेळ राहिली होती. आणखी किती वेळ ती तशीच राहिली असती हें सांगतां येणें कठीण आहे.

भीम जोरजोरानें पावलें टाकीत तेथें आला; त्यामुळें फुलावर खिळलेली द्रौपदीची नजर त्याच्याकडे वळली.

'या ना जरा इकडे !' द्रौपदी भीमाला उद्देशून म्हणाली, 'पहा हें फूल किती सुंदर आहे नाहीं ? अशा प्रकारचा मोहक सुगंध साऱ्या जन्मांत कधीं घेतला नसेल ! माझ्यावर त्या सुगंधानें खरोखर मोहिनी टाकिली आहे. अशा प्रकारचीं आणखी कांहीं फुलें नाहीं का आपल्याला मिळणार ?"

## भीमाकडून फुलांचा शोध

"कां नाहीं मिळणार ? काय अशक्य आहे आपल्याला ?" भीम म्हणाला. द्रौपदीला शक्य त्या परीनें खूष करण्याच्या प्रवृत्तींत तो होता. हातांत गदा घेऊन तो तसाच फुलांच्या शोधार्थ बाहेर पडला.

त्या पुष्पाच्या सुगंधानें आसपासचा भाग दरवळून गेला होता. त्या सुगंधाच्या मार्गानें मार्ग कापीत भीम जात होता. वाऱ्यानें एक फूल द्रौपदीच्या पदरांत येऊन पडलें, मग त्याचें झाड अरण्यांत कुठेंतरी असलेंच पाहिजे. आपण त्याचा शोध लावणार या ईर्षेनें तो बाहेर पडला होता. तो एकसारखा झपाट्यानें पुढें पुढें जात होता. आपण किती

वाट चाललों याचेंहि भान त्याला राहिलें नव्हतें. तें झाड मिळेपर्यंत असेंच चालत रहावयाचें हा त्याचा निर्धार होता. द्रौपदीची आळ पुरविण्यासाठीं व तिला खूष करण्यासाठीं तो बाहेर पडलेला होता.

## शंख फुंकिला

बराच दूरवर आल्यानंतर आपण आश्रम सोडून फार लांब येऊन पोहोंचलों असल्याची एकाएकीं त्याला जाणीव झाली. त्याच्या काखोटीला शंख होता. तो घेऊन त्यानें जोरानें एकदां फुंकला. कानटाळ्या बसविणारा, निजलेल्यांना खडबडून जागे करणारा तो प्रचंड शंखनाद होता ! सारें जंगल त्या आवाजानें थरारलें ! पशुपक्षी सारे प्राणी खडबडून जागे झाले व आकाशाकडे टवकारून पाहूं लागले. तशा प्रकारची गर्जना तत्पूर्वी त्यांनीं कधीं ऐकिली नव्हती.

त्या अरण्यांत एका टोकाला हनुमानाचें वास्तव्य होतें. तो एका वृक्षछायेखालीं स्वस्थ झोंपला होता. शंखनादानें त्याला जागविलें. तो डोळे चोळीत उठून बसला. त्यानें उठतां क्षणींच रागानें आपली शेपटी जमिनीवर जोरानें आदळली. तिचा आवाजही कमी भयंकर नव्हता. त्या भागांत तो सर्वत्र घुमला. भीम जवळच येऊन ठेपला होता. त्याच्या कानीं तो आवाज पडला. कोणीतरी आपणांस आव्हान देत आहे असें त्याला त्याक्षणींच वाटलें.

## रस्ता अडवून बसलेला वानर

ज्या बाजूनें तो आवाज आला त्या बाजूला भीम वळला. चौफेर निरखून पाहूं लागला. एक वयोवृद्ध वानर आपल्या रस्त्यावरच आसन ठोकून आरामांत बसलेला असल्याचें त्यानें पाहिलें. किती शांत, गंभीर दिसत होता तो ! त्याचे डोळे मिटलेले होते. जणूं काय समाधि लागली होती त्याची !

भीम एकेक पाऊल टाकीत त्याच्या पुढ्यांत जाऊन उभा राहिला. पावलांची चाहूल लागल्यामुळें त्या वानरराजानें आपले डोळे उघडिले. तो बोलूं लागला—' हे तरुणा ! कसली गडबड चालविली आहेस ? तुझ्या शंखनादानें माझी झोपमोड झाली ! माझ्याप्रमाणें साऱ्या जनावरांना त्रास झाला असेल. या अरण्यांत असा बेफामपणें कोणीही वागत नाहीं. नवीनच दिसतो आहेत या भागांत आलेला तूं ! तुला कांहीं माणुसकी आहे कीं नाहीं ? कुठून आलास बाबा या अरण्यांत ? काय तुझें नांव ? मी बसलों आहे याच्या पलिकडे कोणालाही जातां येत नाहीं. अरण्याचा येथेंच शेवट होतो समजलास ? तेथेंच थांब. तुझ्या भल्यासाठीं मी सांगत आहे हें ! माझें म्हाताऱ्याचें सांगणें ऐक. आणि हें पहा ! दमला भागलेला दिसतो आहेस तूं. ही पहा येथें कांहीं फळें आहेत. तीं मनमुराद खा. पाणी पी. थोडा वेळ विश्रांति घे आणि आल्या वाटेनें परत जा. याच्यापुढें तुला जातां येणार नाहीं ! '

**भीमाचें आश्चर्य**

भीम हें संभाषण ऐकून आश्चर्यचकित झाला. वानर आणि तो माणसांप्रमाणें बोलतो ! तो म्हणाला, 'बाबा ! तूं आहेस तरी कोण ? अरण्यांतील सर्वसाधारण वानरांच्या आर्दीतला तूं खास नाहीं. वानराच्या रूपानें देवच बोलतो आहे माझ्याशीं असें मला वाटूं लागलें आहे. नांव काय तुझें ? होय; अगोदर मी माझा परिचय करून देतों तुला. मी वायूचा पुत्र; मला भीमसेन म्हणतात. माझ्या मातेचें नांव कुंती. पांडव सध्या वनवासांत आहेत ना ! त्यांपैकींच मी एक आहे समजलास ? '

वानरानें स्मित हास्य केलें व म्हणाला 'काय सांगूं माझ्याबद्दल ! कांहीं नको. मी तुझ्या मार्गांत बसलों आहे. मला येथून आतां हालतां येत नाहीं. मी सल्ला दिल्याप्रमाणें तूं पुढें जाण्याचा प्रयत्न न करतां मागें वळावेंस हें चांगलें ! '

**सल्ला मानला नाहीं :**

भीमाच्या अभिमानाला धक्का लागला. त्याला डिवचल्यासारखें वाटलें. त्याला तो पोक्त सल्ला बिलकुल मानवला नाहीं. तो म्हणाला, 'नको आहे तुझा सल्ला मला ! मी पुढें जावें कीं न जावें हें सांगणारा तूं रे कोण ? मला पुढें जायचें आहे, मी घाईत आहें, माझा मार्ग अडवूं नकोस. येथून नाहीं हाललास तर तुला पश्चात्ताप करून घ्यावा लागेल ? ' ऐक माझें ? '

" मी सांगितलें ना आतांच तुला कीं मी येथून हालूं शकत नाहीं. मी वृद्धपणामुळें अगदीं गलीत झालों आहें. माझा सल्ला न जुमानतां तुला पुढें जायचेंच असेल, तर माझ्यावर उडी मारून तूं पुढें जाऊं शकशील? जा बापडा; माझें काय गेलें ? "

भीम कंटाळला होता त्या बोलण्यामुळें. तो अत्यंत उतावील झालेला होता. तो नासिक सुरांत म्हणाला, " हें पहा ! माझ्यापेक्षां वयानें मोठा आहेस तूं. तुला ओलांडून जाणें मला नाहीं प्रशस्त वाटत. म्हाताऱ्याचा मान आम्हीं राखला पाहिजे; परंतु तूं आपल्या हट्टाला चिकटून रहाणार असलास तर मग निरुपायानें समुद्र ओलांडून जातांना पूर्वकाळीं हनुमानानें जसें केलें, तसेंच मलाहि करावें लागेल ! तसं करूं नकोस ! "

**हा हनुमान कोण बाबा !**

'हनुमान ! हा कोण प्राणी ! त्याचें नांव उच्चारतांना तुझा आवाज बदलला होता. आदर वाटत असावा त्याच्याबद्दल तुला ! कोण रे हा हनुमान ? सांग ना मला ! ' असें बोलून तो वानर किलकिले डोळे करून भीमाकडे पहात राहिला.

'काय सांगायचें आणि काय बोलायचें ! म्हणे मी वानर ! अरे ! वानर कुळांत जन्म घेऊन आणि एवढें मोठें वय होऊन **हनुमान** कोण ? हें तुला माहीत नसावें याचं आश्चर्य वाटतें मला ! अरे ! हनुमान म्हणजे साऱ्या वानरांचा राजाधिराज ! मी त्याचा भाऊ आहें समजलास ? श्रीरामचंद्र प्रभूंच्या काळांत व त्यांच्या जीवनांत मोठमोठाली पराक्रमाचीं कृत्यें केलीं. श्रीरामाची अर्धांगी

सीता; हिला रावणानें पळवून नेऊन बंदिवासांत ठेविली असतां, सीतेला आश्वासनाचा संदेश पोहोंचविणारा हनुमानच. केवढा पराक्रमी होऊन गेला तो! मी त्याचा भाऊ असलों तरी त्याच्यापुढें मी म्हणजे किस झाडका पाला! परंतु तुझ्यासारख्याशीं झगडण्याचा प्रसंग शेवटीं आलाच माझ्यावर तर मात्र मी तुझी जिरविल्याशिवाय रहाणार नाहीं एवढें खास समज तूं! तेव्हां मी समजुतीच्या भावनेनें सांगत आहें तुला. हो पाहूं बाजूला. मला पुढें गेलेंच पाहिजे. या मार्गावरून नाहीं हाललास तर मला तुझ्यावर जबरदस्तीनें हल्ला करावा लागेल! नको करूं तेवढें! हो पाहूं पलीकडे!'

## शेपटी तेवढी बाजूला कर

भीम हमरीतुमरीवर येऊं लागला होता; परंतु वानराचा शांतपणा पूर्ववत् कायम होता. तो गालांतल्या गालांत हंसला. म्हणाला, "असं काय करतोस रे? नको रागावूं माझ्यावर! मी अगदीं म्हातारा झालों आहे रे! नाहीं हालवत माझ्यानें. या म्हाताऱ्याची नाहीं का दया येत तुला? येऊन जाऊन माझी शेपटीच तेवढी तुझ्या मार्गाआड आलेली आहे. खरं ना हें? ती उचलून एका बाजूला ठेव; म्हणजे तुझा मार्ग आपोआप मोकळा होईल. कशाला पाहिजे हुज्जत!"

भीम खदखदां हंसला. शेवटीं आपण जिंकलों असें वाटलें त्याला. त्यानें एका हातानें वानराची शेपटी उचलून बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु ती जराही हालली नाहीं. मग गदा बाजूला ठेवून दोन्ही हातांनी शरीरांतील सारें बळ एकत्र आणून शेपटी हालविण्याचा प्रयत्न त्यानें केला. परंतु शेपटीची जराहि हालचाल झाली नाहीं. ती जागच्याजागीं स्थीर होती!

एकदां नव्हे तर अनेक वेळां व परोपरीनें प्रयत्न करून त्यानें पाहिलें. त्या प्रयत्नांत भीम घामाघूम झाला. भयंकर धक्का बसला त्याला. वानराची शेपटी ती काय आणि माझ्यासारख्या भीमकायाला ती नुसती हालवितां येऊं नये हें केवढें आश्चर्य!

वानरराज स्वस्थ बसून ही मौज व धडपड पहात होते.

## भीमाचा पराभव

भीम त्या झटापटींत हरला होता. पराभव कबूल केल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. त्यानें लाजेनें मान खालीं घातली. कधींहि असा अपमानकारक प्रसंग त्याच्यावर आला नव्हता. भीम आतां उमगला. हा वानर दिसतो तसा साधासुधा नाहीं. हा कोणतरी देवपुरुष आहे खास.

भीम हात जोडून त्या वानरापुढें अदबीनें उभा राहिला. त्याचा सारा अहंकार गळाला होता. तो म्हणाला, 'हे वानराजा! क्षमा करा माझ्या उद्धटपणाची! बोलूं नये तें बोलून गेलों अहंकाराच्या भरांत! तुम्हीं वृद्ध आणि मी तरुण! मी मुलासारखा आहें तुम्हांला! आतांपर्यंत जी हुज्जत घातली ती पोटांत घाला आणि क्षमा करा मला. मला आतांतरी नांव कळूं द्या तुमचें!' हें बोलतांना भीमाचे डोळे पाणावले होते.

## मी वायुपुत्र हनुमान !

तो वानर खदखदां हंसला आणि म्हणाला, 'मी कोण हें तुला सांगायला आतां मीहि फार आतुर झालों आहे. ऐक तर ! अरे ! मी आहें वायुपुत्र हनुमान !'

ते शब्द कानीं पडतांच भीमाचें सर्वांग थरारलें. दोघेही एकमेकांस कडकडून भेटले ! त्या भाऊभेटीला कसली उपमा द्यावी हेंच समजत नाहीं. दोघेही आपापल्या परीनें बडे ! दोघांच्याही नेत्रांवाटे प्रेमाश्रूंचा प्रवाह सुरू झालेला होता. भीमानें 'माझा लाडका भाऊ ! असें म्हणून पुन्हां हनुमानला घट्ट कवटाळावें ! किती तरी वेळ त्या बळ्या भाईच्या प्रेमळ भेटीचा हा सुखसोहळा त्या वृक्षराजींत चालू होता. काय बोलावें हें कोणालाही सुचेना. किती आकस्मिक रीतीनें कांहीं एक हासभास नसतां दोघांची भेट झाली होती; आणि तीही किती नाट्यपूर्ण प्रसंगीं !

'किती आश्चर्यकारक प्रसंग आहे हा ! असा अनन्यसाधारण क्षण आयुष्यांत क्वचित्च येत असतो. मी हा क्षण केव्हांही विसरणार नाहीं. या क्षणाच्या संस्मरणार्थ भीमा ! तूं कांहींतरी भव्य व उदात्त असें माझ्याजवळ माग !'

भीम काय मागणार ? त्याच्यानें कांहीं मागवेना. तो म्हणाला, 'दादा ! काय मागूं मी ? तूं आमच्याजवळ नेहमीं असावें असें मला वाटतें. तूं आलास जवळ म्हणजे पुढें कौरवांबरोबर आमचें जें युद्ध होणार आहे, त्यांत विजयश्री आमच्या गळ्यांत माळ घालील ! रहाशील ना आमच्याबरोबर !

## जेथें धर्म तेथें जय

'कां नाहीं रहाणार तुमच्याबरोबर ? जेथें धर्म आहे तेथें जय मिळावयाचाच. मी असलों नसलों सारखेंच आहे; परंतु माझें सान्निध्य तुम्हांला सतत लाभेल. युद्धप्रसंगीं अर्जुनाच्या रथावरील झेंड्याचा जो खांब असेल त्या खांबावर मी बसलेला असेन. तुमच्या सैन्याला माझ्याकडून प्रोत्साहन मिळत जाईल व शत्रूच्या सैन्यांत घबराट पसरलेली असेल. त्याची चिंता नको तुला. प्रत्यक्ष भगवान् तुमचा सहकारी आहे; तेथें इतरांची काय कथा ?

निरोप घेण्यापूर्वी दोघेहि पुन्हां एकवार कडकडून भेटले.

—कमला सुब्रह्मण्यम् यांच्या एका कथेच्या आधारें साभार.

# उद्धरण ब्रीद माझें

लेखक : त्रिमूर्ति

पारमार्थिक वा सामाजिक जीवन कष्टप्रद आहे याची जाणीव बाबांना होती. आपले भक्त संन्यासी नाहींत. ते संसारी आहेत. त्यांच्यावर कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या आहेत. त्यांना कर्मभोग आहे. यामुळें नाना संकटें व हालअपेष्टा त्यांच्या वांट्यास येतील व वेळ प्रसंगीं ते गांगरून जातील वगैरे सर्व गोष्टींचा हिशोब बाबांनीं केला होता. अशा प्रसंगीं आपल्या भक्तांचें धैर्य टिकावें, ते गलितधैर्य होऊं नयेत म्हणून बाबांनीं मी तुमच्यासाठीं काय काय करीन याची ग्वाही दिली आहे. ती ध्यानांत ठेवली तर संकटकालीं भक्तांचें धैर्य टिकून राहील यांत संशय नाहीं.

## बाबांचें सर्वत्र वास्तव्य

श्रीबाबांची म्हणजे मानवतेची पुजा ज्या तऱ्हेनें करावी अशी बाबांची इच्छा आहे त्या तऱ्हेनें आपण पूजा केली कीं बाबांची आपल्यावर सदैव कृपा राहील. बाबांचे म्हणजे हृदयस्थ परमेश्वराचें सदैव नामस्मरण व सेवा केली पाहिजे. बाबा सर्व प्राणिमात्रांच्या हृदयस्थ आहेत एवढेंच नव्हे, तर सर्व अचेतन वस्तूही त्यांनीं व्यापल्या आहेत. ब्रह्मांडांतील चराचरांतील अणूरेणुंतही बाबा व्यापून राहिले आहेत, आपणही त्यांतील एक आहोंत म्हणून आपण व इतर असा वस्तुतः भेद नाहीं, अशी उपनिषदांनीं वर्णलेली एकात्मतेची भावना आपल्या ठिकाणीं हळुहळू वाढविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. हा कसा करावा हें वेळोवेळीं बाबांनीं सांगितलें आहे. त्याचें पालन आपण दक्षतेनें करीत राहिलें पाहिजे.

माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा. असें कराल तर मी तुमचें कल्याण करीन, तें माझें ब्रीद आहे, असें बाबांचें आश्वासन आहे. मात्र आपलें कल्याण कशांत आहे हें आपल्यापेक्षां बाबांना अधिक चांगले ठाऊक आहे हें विसरूं नये. नाहींतर आपली निष्ठा ढळेल. निष्ठेचें अधिष्ठान हृदयीं नसले तर बाबा हातीं लागणार नाहींत. कित्येक वेळां असें होऊं शकेल कीं आपण बाबांकडे जें मागूं त्याच्या नेमकें उलट घडून येईल. अशाच वेळीं निष्ठा डळमळते. म्हणून आपण एक गोष्ट दृढ धरावी कीं बाबा जें करतात तें आपल्या कल्याणाचेंच असतें. आज जरी तें अयोग्य वाटलें तरी कालांतरानें तेंच योग्य होतें हें उघड होईल. ' आपण कांहींच करीत नाहीं. जें होतें तें बाबाच करवून घेतात. आपलें हित कशांत आहे हें बाबा पूर्ण जाणतात. ' अशी दृढनिष्ठा सदैव बाळगून मनाविरुद्ध जरी कांहीं घडलें तरी विषाद न मानतां जीवन कंठण्याची वृत्ति आपण कमावली कीं मग बाबा सांगतात त्याप्रमाणें ते आपल्या भक्ताच्या कल्या-

पार्थ सर्व कांहीं करण्यास तयार आहेत. अशा वृत्तीच्या भक्तालाच बाबा 'सद्भक्त' म्हणतात.

### गाऱ्हाणें कसें पोंचणार ?

आपल्या भक्तांनीं निराश होऊं नये म्हणून बाबांनीं वेळोवेळीं धीर दिला आहे. शिर्डी फार लांब. आपणांस जातां येत नाहीं. मग आपलें गाऱ्हाणें बाबांना कसें कळणार? कोण सांगणार? वगैरे शंका अजाण मनामध्यें येऊन धीर खचतो व निराशा वाटते. हें ओळखून बाबा सांगतात कीं, 'तुम्ही कुठेंही असलांत तरी तुमच्या सर्व गोष्टी मला समजतात. मोठ्यानें तर राहोच पण मनांत जरी तुम्हीं बोललांत तरी तें मला ऐकूं येतें. मी फक्त शिर्डींत आहे असा तुमचा समज आहे झालें. म्हणून मला सर्व कसें कळतें याचें तुम्हास आश्चर्य वाटतें. मी केवळ शिर्डींतच नाहीं, तर तुम्हां प्रत्येकाच्या हृदयांतहि आहे. माझी समाधि केवळ शिर्डीस नाहींतर तुम्हां हृदयींहि ती आहे मी सर्वत्र तुमच्या जवळ आहे, प्राणिमात्राचें हृदय ही माझी खरी शिर्डी आहे. म्हणून तुमच्या भावनेंतील सूक्ष्मात सूक्ष्म अशा छटाही मी जाणूं शकतों. तुम्ही माझ्यापासून कांहींही लपवूं शकत नाहीं.' बाबांचे हे बोल सदैव ध्यानांत ठेऊन आपण आपला धीर खचूं देऊं नये.

लौकीक दृष्ट्या बाबांनीं समाधि घेतली असली तरी बाबा चिरंजीव आहेत, त्यांनीं आपली कफनी टाकून दिली एवढेंच. तें कोठे गेले नाहींत कीं आले नाहींत. ते मुळच आहेत तथेंच म्हणजे सर्वांच्या हृदयीं—चराचरांत आहेत. आज ते देहधारी नाहींत म्हणून आपल्या शक्तिहीन इंद्रियांनीं ते दिसत नाहींत कीं भासत नाहींत एवढेंच. बाबांची समाधि केवळ दगडा विटांची आहे असें समजूं नका. त्या दगडा विटांच्या अणूअणूंतून बाबांचें वास्तव्य आहे, त्यांची शक्ति खेळत आहे. बाबांनीं जिवंत समाधी घेतली नसेल पण त्यांची समाधी मात्र जिवंत आहे, जागती आहे, शिर्डीला दोन जागत्या ज्योति आहेत. एक समाधी व दुसरी धुनी. म्हणूनच बाबा सांगतात कीं, माझीं हाडें तुम्हां बरोबर बोलतील, माझी समाधी तुम्हांबरोबर हंसेल, बोलेल, मात्र तुमची तेवढी योग्यता व श्रद्धा असली पाहिजे. बाबांचीं हीं आश्वासनें सत्य आहेत, याचा अनुभव अनेक भक्तांना आला आहे व येत आहे. म्हणूनच श्री साईसच्चरित्रांत यासंबंधीं ज्या ओव्या आहेत त्या आपण सदैव ध्यानीं घरूं या.

१ जो मजलागीं अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्भजन।
माझें चिंतन माझें स्मरण। तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥ ३–१५ ॥

२ कृतांताच्या दाढेंतून। काढीन मी निजभक्ता ओढून।
करितां केवळ मत्कथा श्रवण। रोग निरसन होईल ॥ ३–१७ ॥

३ कुठेंहि असा कांहीं करा। एवढें पूर्ण सदैव स्मरा।
कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा। मज निरंतर लागती ॥ ३–१२४ ॥

४ माझिया भक्ताचे धामीं । अन्नवस्त्रा नाहीं कमी ।
ये अर्थी श्री साई दे हमी । भक्तासी नेहमीं अवगत ॥६-३१॥

५ साई साई नित्य म्हणाल । सात समुद्र करीन न्याहल ।
या बोला विश्वास ठेवाल । पावाल कल्याण निश्चयें ॥ १३-१२॥

६ तुम्ही कोणी कुठेंही असा । भावें मजपुढें पसरितां पसा ।
मी तुमचिया भावासरिसा । रात्रं दिसा उभाच ॥ १५-६७ ॥

७ कुठेंही जा दुनियेवर । मी तो तुम्हां बरोबर ।
तुम्हां हृदयींच माझें घर । अंतर्यामीं तुमचे मी ॥ १५-६९

८ माझा भांडार भरपूर आहे । देईन जो जो जें जें चाहे ।
परी ग्राहकाची शक्ति पाहे । देतों मी साहे तेंच कीं ॥ १७-७८

९ झालों जरी गत प्राण । वाक्य माझें माना प्रमाण ।
माझीं हाडें तुर्बती मधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ २५-१०५

१० मी काय पण माझी तूर्बत । राहील तुम्हांसवें बोलत ।
जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवें ॥ २५-१०६

११ डोळ्या आड होईन ही चिंता । करूं नका तुम्ही मज करीतां ।
माझी हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हां सवें ॥ २५-१०७

१२ मज होऊनी अनन्य शरण । जया माझें अखंड स्मरण ।
तयाचें मजमाथीं ऋण । फेडीत उद्धरण करुनियां ॥ ४४-१५१

१३ म्हणाल आतां मी आहे कोठें । आतां मी तुम्हां कैसा भेटे ।
तरी मी तुमचें हृदयींच तिष्ठे । विनाकष्ट संनिकट ॥ ४४-१६२

अशा प्रकारें बाबांनीं आपल्या भक्तांना धीर दिला आहे. एवढ्यानें भक्तांचें समधान कदाचित होणार नाहीं म्हणूनच कीं काय बाबा सांगून गेले—

१४ आठा वर्षांचा बाळ जनीं । प्रगट होईन मी मागुतेंनी ।
ऐसे महाराज भक्तांलागुनी । आहेती सांगुनी राहिले ॥ ४३-१३९

॥ श्री साईनाथार्पणं अस्तु ॥

---

## माझी प्रार्थना

हे भगवंता ! माझ्या अंतरांत मी तुला साठवून ठेवीन एवढें मोठें माझें अंतःकरण बनव. त्याला सर्वत्र बंधुभाव अनुभवास येऊं दे सर्वांशीं मला सख्य जोडूं दे. सर्वत्र तुलाच पाहूंदे. हीच माझी एकमव प्राथना.

—परमहंस योगानंद.

# माझा एकमेव जीवनाधार

—महात्मा गांधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची प्रार्थनेवर किती असीम श्रद्धा होती व प्रार्थनेमुळेंच वेळोवेळीं आपला बचाव कसा झाला, तसेंच प्रत्येकानें प्रार्थनेची कांस कां धरावी, यांचें सुंदर विवेचन त्यांच्या या लेखांत वाचा.

माझ्या जीवनाचा एकमेव आधार जर कोणता असेल तर तो म्हणजे प्रार्थना. प्रार्थनेचा सहकार मला लाभला म्हणूनच मी या जगांत वावरूं शकलों. तो आधार व तो सहकार मला लाभला नसता तर मी कधींच वेडा बनलों असतों. ज्यांनीं माझी आत्मकथा वाचली असेल त्यांना समजून चुकलें असेल कीं, सार्वजनिक क्षेत्रांत त्याच-प्रमाणें खाजगी जीवनांत अनेक वेळां मला वाईटांतील वाईट व अत्यंत कटु अनुभव आले आहेत. त्यामुळें अनेक वार मी निराशेच्या खाईत तात्पुरता तरी बुडालों असेन; परंतु त्या खाईतून मला जर कोणी वर काढलें असेल व काळोखांत प्रकाश दाखविला असेल तर तो केवळ प्रार्थनेनेंच. अशा रीतीनें प्रार्थना हाच माझा जीवनाधार होऊन राहिला आहे.

**मला वळावेंच लागलें प्रार्थनेकडे**

या ठिकाणीं एक गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, मी सत्याचा ज्या असीम प्रमाणांत भक्त आहे किंवा सत्याशीं जेवढी माझ्या जीवनाची सांगड घातली गेली आहे तेवढ्या प्रमाणांत प्रार्थनेशीं मी निगडीत झालों आहें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. माझ्या जीवनांत प्रार्थनेनें जो प्रवेश केला तो जरुरी मुळें. मी संकटांत सांपडलों असतां मला तिची जरुरी भासली. असे संकट प्रसंग कधीं कधीं आठवले कीं, प्रार्थनेचा आधार घेतल्या शिवाय मला गत्यंतर राहिलें नाहीं असें घडलें. मला वळावेंच लागले प्रार्थनेकडे.

ईश्वरावरील माझी श्रद्धा जसजशी वाढत गेली तसतसा प्रार्थनेकडे मी अधिका-धिक खेचला जाऊं लागलों. पुढें पुढें मला प्रार्थनेचा ध्यास लागूं लागला. केव्हां एकदां प्रार्थनेकडे वळतों अशी मनाला ओढ लागूं लागली. प्रार्थनेशिवाय जीवन शुष्क वाटूं लागलें; निर्जीव व निष्प्रभ वाटूं लागलें.

**मी शांत कसा?**

शांतता ज्याच्या वाट्याला आली त्याला आणखी काय पाहिजे? माझी आणि शांततेची ताटातूट केव्हांही होऊं शकली नाहीं. सभोंवार पसरलेल्या कोलाहलांत मी मात्र शांत कसा? असा माझ्याबद्दल विस्मय वाटून अनेकांनीं माझा हेवा केल्याचें मला माहीत आहे. आणि ती निरामय शांतता मला कशामुळें लाभली सांगूं का? तिची गुरुकिल्ली म्हणजे प्रार्थना! मीं खरोखर सांगतों कीं मी विद्वान् नाहीं; विद्वत्तेवर मी हक्क सांगूं शकत नाहीं; परंतु प्रार्थनेवर हक्क सांगूं शकतों. मी प्रार्थनेमुळें मनुष्यत्वाप्रत पोहोंचलेला एक साधासुधा माणूस आहें.

## मार्ग रुळलेला आहे

प्रार्थना कशी करावी, कोणत्या साच्याची असावी हें मी सांगूं शकत नाहीं किंवा त्या गोष्टीला मी महत्त्वहि देऊं इच्छित नाहीं. त्याबाबतींत ज्याचा त्यानें शिक्षक व्हावें व आपला मार्ग चोखाळावा. असें असलें तरी कांहीं रुळलेले मार्ग आहेत. त्या मार्गानें जाऊन कांहीं माणसें त्या क्षेत्रांत यशस्वी झालीं आहेत. त्या मार्गानें जाणें सुरक्षित व फायद्याचें होईल असें वाटतें. अनेक साधूसंत त्या मार्गानें गेले आहेत. त्या मार्गावर कांहीं संतांची यशस्वी पावलें पडलीं आहेत. त्या रुळलेल्या मार्गानें जाणें हें केव्हांही श्रेयस्कर.

प्रार्थनेमुळें मी बचावलों आहें. अनेक वेळां संरक्षक कवचाप्रमाणें मला प्रार्थनेचा उपयोग झाला आहे हें मी सांगितलें. मी माझा अनुभव सांगितला. प्रत्येकानें प्रार्थनेची कास धरून स्वतःला काय अनुभव येतो, कांहीं तरी नवीन ज्ञाताला लागलें, कांहीं तरी दिव्यलाभाचा लाभ घडला, अशी सुखसंवेदना होते कीं नाहीं हें पहावें.

## ईश्वर स्वयंसिद्ध आहे

या जगांत कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्या स्वयंसिद्ध असतात. कांहीं स्वयंसिद्ध नसतात. ईश्वराचें अस्तित्व हें भुमितीच्या गणिताप्रमाणें स्वयंसिद्ध आहे. आमच्या अंतःकरणाला त्याची जाणीव होवो वा न होवो. बुद्धिमान माणसांना त्याचें आकलन होईलच असें नाहीं. ईश्वराचें अस्तित्व वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं. तो ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा, आंतरिक संवेदनाचा, स्वानुभवाचा प्रश्न आहे. कारणें किंवा उदाहरणें देऊन ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करूं पहाणें व्यर्थ आहे. त्याच्या पलिकडची ती गोष्ट आहे.

सर्व कारणें आणि उदाहरणें बाजूला सारावीं आणि श्रद्धेची कास धरावी. निर्मळ, शुद्ध, श्रद्धा. तिच्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. मी या जगांत वावरत आहें ना ? हालचाल करीत आहे ना ? तसाच देवही या जगांत आहे. मी जिवंत आहें, वावरतों आहें याचें आदिकारण तोच आहे.

## प्रार्थनेची सर्वांना जरुरी

ईश्वराचें अस्तित्व मान्य केल्यानंतर प्रार्थनेची जरुरी काय हें सांगायलाच नको. त्याची प्रार्थना करणें हाच जीवनांतील आनंद व आधार. आमचें दैनंदिन जीवन ही एक दीर्घ प्रार्थनाच आहे; वेगळया प्रार्थनेची किंवा तिच्यासाठीं एकांतांत बसण्याची जरूरी काय ? असा प्रश्न आपण करूं नये. परमात्म्याशीं ज्यांचें नातें जडलें, त्या दिव्य प्रकाशांत जे वावरूं लागले, त्यांनींही प्रार्थनेशीं संबंध केव्हांही सोडला नाहीं. त्यांचें जीवन प्रार्थनापूर्ण व निरंतर प्रार्थनेनें ओतप्रोत भरलेलें होतें. ठराविक वेळ प्रार्थनेंत घालविल्याशिवाय ते राहिले नाहींत. भगवंताची प्रार्थना, त्याचें सतत स्मरण व नित्य ध्यास हेंच त्यांना सर्वस्व होऊन राहिलें होतें; कारण त्यांनीं प्रार्थनेचें अपरंपार महत्त्व ओळखलें होतें. आपणहि तें ओळखूं या.

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



## अध्याय सातवा

श्रीगणेशास, सरस्वतीस गुरूस, कुलदैवतास, सीतारामचंद्रास, सद्गुरु साईनाथास नमस्कार. आतां पूर्वकथेच्या अनुषंगानें बाबांना देवालयांच्या जीर्णोद्धाराविषयीं कशी आवड होती हें स्मरणपूर्वक लक्षांत आणूं या.

बाबा परोपकारासाठीं कसे झटत, आपल्या भक्तांचा कसा सांभाळ करीत व त्यांचीं दुःखें स्वतः सोसून त्यांच्यासाठीं आपला देह कसा झिजवीत हें पहाण्यासारखें आहे. ते समाधीसह अष्टांग योग आचरीत असत. इतकेंच नव्हे, तर धौतीनेती, पोती इत्यादि क्रिया करून करपद शीरादि इंद्रियें निरनिराळीं करीत व तशीच तीं पूर्ववत् एकत्रही भरीत. हिंदु म्हणावें तर ते यवनासारखे दिसतात. बरें, यवन म्हणावें तर अंगावर हिंदुत्वाचीं सर्व उत्तम लक्षणें दिसत आहेत असा हा विलक्षण अवतार. याचें पूर्णपणें वर्णन कोण करूं शकेल ? जातीनें हिंदु होते याचा कोणालाही थांगपत्ता लागला नाहीं; कारण या दोन्ही वर्गांशीं त्यांची वागणूक नेहमीं सारखीच असे. रामनवमी हा हिंदूंचा सण पण त्या दिवशीं स्वतः आपण सभामंडपांत पाळणा बांधूनच ते कथाकीर्तनें करवीत. त्याच दिवशीं रात्रीं संदल मिरविण्यास यवनानांही ते आज्ञा देत असत. जमवून जमतील तितके मुसलमान एकत्र होऊन संदल मिरवीत. अशा रीतीनें दोन्ही उत्सव ते आनंदानें समसमान करवून घेत असत. रामनवमीच्या दिवशीं कुस्त्या लावण्याची त्यांना मोठी हौस असे व त्यावेळीं धोडे, तोडे पगड्या वगैरे बक्षिसें देण्यांत त्यांना फारच उल्हास होई. गोकुळ अष्टमीचा सण आला म्हणजे ते गोकुळकाला करवून घेत आणि ईदच्या दिवशीं मुसलमानांना नमाज पढण्यास कोणतीच आडकाठी नसे. एकदां मोहरमचा सण आला असतां कांहीं यवन 'ताजा' किंवा ताबूत बनवून गांवांतून मिरवणूक काढण्यासाठीं बाबांस विचारण्यास मशिदींत आले. बाबांची आज्ञा मिळतांच ताबूत तयार झाले. चार दिवस ठेवून पांचव्या दिवशीं खालीं काढण्यांत आलें. याबद्दल बाबांच्या मनाला सुख नाहीं किंवा दुःख नाहीं.

बाबांना यवन समजावें तर हिंदूसारखे त्यांचे कान टोंचलेले होते. हिंदू म्हटलें तर त्यांना सुंता मान्य होती अशा तऱ्हेनें हिंदूही नाहीं आणि यवनही नाही असा हा परमपवित्र साई अवतार आहे. बाबा हिंदू आहेत असा दावा मांडला तर त्यांचें राहणें नेहमींच मशिदींत असे. त्यांना यवन म्हणूं जावें, तर मशिदींत अहोरात्र धुनी पेटलेली असे; जात्यावर दळण दळलें जावून घंटाशंखवादन व अन्नसंतर्पणही होत असे. त्याचप्रमाणें सदैव भजन, अन्नसंतर्पण अर्घ्य–पाद्य–पूजनही होत असे. मग बाबा मुसलमान कसे हो ? ते जातीनें म्लेंच्छ आहेत असें म्हणूं जावें तर उच्चवर्णीय अग्निहोत्री ब्राह्मण आपल्या ब्राह्मण्याचा व सोवळ्याचा अभिमान टाकून त्यांचें पूजन करून त्यांच्या पायावर लोटांगण घालीत आहेत. अशा तऱ्हेनें विस्मयचकीत होऊन जे जे त्यांची प्रचीति पाहावयास येतात, तेसुद्धां तसेंच वागतात आणि गुपचूप त्यांचें दर्शन घेतात. ज्याला देहाभिमान नाहीं त्याला सर्व वर्णांचे लोक सारखे, मग ते हिंदू असोत वा मुसलमान असोत, जातींचें भिन्नपण तो जाणतच नाहीं. पुढल्या वर्षी कदाचित् तोटा येईल म्हणून शेतकरी चालू वर्षीतील धान्याचा कांहीं भाग मोटा किंवा कणगा बांधून सांठवून ठेवीत असतो त्याचप्रमाणें बाबांच्या संग्रहीं एक गव्हाचें पोतें असे. आणि मशिदींत गहूं दळावयास एक जातें असून गहूं पाखडण्याकरितां एक सूपही होतें. त्यांच्या संसारांत कांहींच न्यूनता नव्हती. सभा मंडपांत एक सुंदर तुलसी वृंदावन होतें. त्याच्याच बाजूला उत्तम कांतलेला असा लाकडी रथ असे. या उत्तम वस्तूच्या गांठीं कांहींतरी पुण्य होतें म्हणूनच तिची बाबांशीं भेट झाली. अशीच दृढ भावना आपण मनांत ठेविली तर आपणांस कांहींच कमी पडणार नाहीं. पूर्वजांच्या पुण्याईमुळेंच हे साईचरण माझ्या हातीं लागले. त्यामुळें मनाला शांति लाभली असून संसारांतही निश्चिंति आली आहे हे श्रीसाईसमर्थ समागम जन्यसुख भोगून मी अतिशय धन्य झालों आहे. पुढें कितीही सुखसंपन्न मी झालों तरी हें सुख मला कधीं प्राप्त होणार नाहीं. स्वानंदस्वरूप असे साई, त्यांची महति मी किती बरें वर्णूं ? जो त्यांच्या चरणीं रत झाला त्याला त्यांनीं ठायींच बसवून ठेवलें. अनेक तापसी, तडी, तापडी, संन्यासी, त्यागी, उदासी हरिद्वारादि तीर्थांच्या ठिकाणीं वास करणारीं मंडळी येत. त्यांच्याबरोबर त्यांनीं बोलावें, चालावें आणि उदंड हंसावें. त्यांच्या जिव्हेवर अखंड 'अल्ला मालिक' मंत्र असे. वितंडवाद त्यांना कधींही आवडत नसे व त्यांच्याजवळ नेहमीं एक सटका असे. राव असो वा रंक असो. लक्ष्मी-पुत्र असो किंवा भिकारी रंक असो. सर्वांबरोबर त्यांची सारखीच वागणूक असे व त्या दोघांनाही त्यांच्याजवळ एकच माप असें. प्रत्येकाचे बरेंवाईट कर्म गुह्यांतलें गुह्य मर्म ते जाणत असत व वेळप्रसंगीं हें वर्म सांगून ते खूणही पटवून देत. यामुळें भक्तांना अतिशय आश्चर्य वाटत असे. जणूं काय जाणपणाचें ते सांठवण असून नेणतेपणाचें पांघरूणच होतें. अशी ही साईचीं लक्षणें होतीं. जरी त्यांनीं मानवाची काया धारण केली असली तरी त्यांची करणी अपूर्व अशीच देवाची होती. त्यांना मानसन्मानाचीही कधीं क्षिति नव्हती. जणूं काय शिरडींत देवच अवतरले आहेत, याच भावनेनें सर्व लोक त्यांना भजत असत.

बाबांचे चमत्कार ! मी पामर किती वर्णन करूं शकणार ? अनेक देवा–देऊळां च्याही त्यांनीं जीर्णोद्धार करवून घेतला. शिरडींत तात्या पाटलाच्या हातून देखील तेथील,

शंकर पार्वती, शनि, गणपति,ग्रामदेवी आणि मारुति या देवांना सुस्थितींत आणून ठेविलें. बाबा लोकांकडून दक्षिणेच्या मिषानें पैसे घेत. त्यांतले कांहीं ते धर्मार्थ वाटीत, तर कांहीं असेंच देत. कोणाला रोज तीस रुपये, कोणास दहा, पंधरा, पन्नास मनाला येईल त्याप्रमाणें ते मोठ्या आनंदानें वांटीत असत. हा सर्व धर्माचा पैसा. घेणाराला सुद्धां हीच खात्री असे. त्यांचा असाच उत्तम विनियोग व्हावा, हीच बाबांची इच्छा असे. असो. श्रीसाईच्या दर्शनानें कित्येक पुष्ट झाले, कितिएक दुष्ट सुष्ट झाले. त्यांच्या पवित्र आणि पावन अशा दर्शनानें कित्येकांचें कुष्ट गेलें आणि अनेकांनीं आपलें हित साधलें कोणत्याही तऱ्हेचे अंजन. पाला किंवा रस न घालतां कित्येक अंध त्यांच्या पायास लागून डोळस झाले. आणि कित्येक पांगळेही त्याच प्रमाणें चालूं लागले.

बाबांचा महिमा अतिशय वाढूं लागला. कोणालाच त्याचा थांग लागेना. यात्राही अपरंपार जमूं लागली. धुनी जवळच मलमूत्राचें विसर्जन करून कधीं पारोसे तर कधीं स्नान झालेलें असे, ते ध्यानावस्थेंत राहत असत. नेसावयास स्वच्छ धोतर, अंगांत सदरा किंवा पैरण आणि डोकीस खास पांढरे पागोटें असा त्यांचा आरंभी पोषाख असे. सुरवातीस ते गांवांत वैद्यकीही करीत. औषधें देत आणि त्यांच्या हाताला यशही उत्तम होतें. उत्तम हकीम म्हणून ते प्रसिद्धी पावले. एकदां एका भक्ताचे डोळे सुजून लाल झाले व दोन्ही बुबुळें रक्तबंबाळ झालीं होती. शिरडींत कोणी वैद्यही नव्हता. बिचारे भोळे भाविक भक्त ! त्यांनीं बाबांस डोळे दाखविले. कोणी काय केलें असतें ? डोळ्यांत सुरम्याच्या काड्या घातल्या असत्या. कोणी दुधाच्या घड्या डोळ्यावर ठेवल्या असत्या, नाहींतर थंड कापूर ठेवला असता. पण बाबांनीं काय केलें ? बाबांचा उपायच वेगळा ! त्यांनीं तावडतोब बिब्बे ठेंचून त्याचे गोळे करविले. त्यांनीं एक एक गोळा चिसून डोळ्यांत भरला आणि त्यावर एक फडका बांधला. दुसऱ्या दिवशीं डोळ्यांची पट्टी सोडण्यांत येऊन त्यावर पाण्याची धार धरली त्यांनीं. डोळ्यांची सूज जाऊन बुबुळेंही स्वच्छ झालीं होतीं. डोळ्यासारखा भाग; किती नाजूक ! पण बिब्यांची मुळींच आग झाली नाहीं. बिब्यानें डोळ्यांचा रोग घालविला ! असे अनेक अनुभव भक्तांना मिळत होते.

धौती, पोती इत्यादि योगप्रकारही बाबांना उत्तम प्रकारें अवगत होते. कोणासही न कळवितां ते एकांत स्थळीं जात. तेथें स्नान करतांना आंतडीं ओकून बाहेर काढीत व धुवून वाळावयास टाकीत. मशिदीहून विहीर जितकी दूर होती तितकेंच पुढें एक वडाचें झाड होतें. त्याच्या पलीकडे दुसरी एक विहीर होती. एक दोन दिवसाआड ते तेथें जात असत. दिवसा भर दुपारच्या वेळीं आजुबाजूला कोणी नाहीं असें पाहून आडांतून पाणी काढून ते मुखमार्जन करीत असत; असो. असाच एका प्रसंगीं स्नान करितांना ते पोटांतलीं आंतडीं बाहेर काढून धुवूं लागले. बोकड मारला म्हणजे त्याचीं आंतडीं आंतून उघडी करून व धुवून घडीवर घडी घालून ठेवतात. तशींच बाबांनीं आपलीं आंतडीं काढून आंत बाहेरून स्वच्छ करून जांबाचे झाडावर पसरून ठेविलीं. हें पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. ज्यांनीं ही स्थिति पाहिली ती मंडळी अद्यापीही हयात आहेत. ते म्हणतात बाबा म्हणजे एक अपूर्व वल्ली !

# श्री पुण्यतिथीचा सोहोळा

यंदा श्रींची पुण्यतिथी विजयादशमी दि. ३० सप्टेंबर ६० रोजीं होती. व त्याकरितां उत्सव दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ व २ ऑक्टोबर ६० रोजीं होता. दि. १ ऑक्टोबर रोजीं एकादशी असल्यानें त्या दिवशी काला होऊं शकत नाहीं म्हणून काला दि. २ ऑक्टोबर ६० रोजीं होता.

पुन्हां पुन्हां सांगावेसें वाटतें कीं श्रींची पुण्यतिथी विजयादशमीच्याच दिनीं येते. कारण मागें तीन ठिकाणीं तीन निरनिराळ्या तिथि ह्या श्रींच्या पुण्यतिथी म्हणून समजून उत्सव केले गेले. कोणी विजयादशमी, कोणी दशमी युक्त एकादशी, व कोणी एकादशी असे तीन निरनिराळे दिवस श्रींचे पुण्यतिथीचे म्हणून समजले. अशा अडचणीच्यावेळीं ह्या प्रश्नाचा निकाल, त्यावेळेच्या भक्तश्रेष्ठांनीं श्रींचे समाधीपुढें चिठ्ठया टाकून लावून घेतला व त्यांत श्रींची पुण्यतीथि विजयादशमीच असें निश्चित झालें. तरी ह्या बाबतींत कोणाचाही गैरसमज असूं नये व होऊं नये.

प्रतिवर्षीप्रमाणें यंदाही स्टेट ट्रॅन्स्पोर्टनें जादा व स्पेशल गाड्यांची व्यवस्था ठेविली होती. पोलीस, होमगार्ड व स्वयंसेवक हेही नित्याप्रमाणें उपस्थित होते. नगरचे सुप्रसिद्ध मंडप कॉन्ट्रॅक्टर हिरालाल मुथा ह्यांनीं नेहमीप्रमाणें मंडप घातले होते. व्यवस्थापक समितीचे सभासद व विश्वस्त उपस्थित होते. परंतु यंदा जेवढी नेहमीप्रमाणें यात्रा हवी किंवा असावयाची तितकी नव्हती, फारच कमी होती.

उत्सवास सुरवात दि. २९ रोजीं पहांटेस शांत मंगलमय वातावरणांत कांकड-आरतीनें झाली. व कांकड आरतीनंतर श्रीसाईसच्चरित् पोथी व वीणा व नाशिकच्या कै. गुळे महाराजांचे परमभक्त पुण्याचे श्री. दादासाहेब आंबेकर यांनीं मोठ्या प्रेमानें अर्पण केलेल्या श्रींच्या तैलचित्राची, मिरवणूक, चोपदाराच्या ललकारींत, टाळांच्या निनादांत व 'साईनाथगुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं' अशा भजनानंदांत निघाली व श्रींच्या गुरुस्थानावरून द्वारकामाईंत येऊन विसर्जन झाली. द्वारकामाईच्या सभामंडपांत वरील भजनास-अखंड साईनामकीर्तनास म्हणजे २४ तास-सुरवात झाली. द्वारकामाईतील संस्थानचा नोकर श्री. माधव तेली हा नेहमीच तेथें चांगली व्यवस्था ठेवतो. पॉवरहाउसचे श्री. वसंतराव कुलकर्णी हेही तर्थे विद्युद्दीपाची व दूर ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करतात. वर सांगितलेल्या 'श्री'च्या तैलचित्रासमोर श्रीसाईसच्चरित् वाचनास सुरुवात संस्थानचे स. चिटणीस डॉ. दाभोळकर यांच्याकडून झाली. अवतरणिकेचा अध्याय वाचण्याचें भाग्य ह्या लेखकाला मिळतें वीणा गळ्यांत घेऊन 'साईनाथ गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं' या भजनाची सुरवात लेखकाकडून व समाप्ति डॉ. गजानराव दाभोळकर यांच्याकडून होते. ह्या कार्यक्रमांच्या बाबतींतहि भक्तांना तर प्रेमाची सूचना द्यावीशी वाटते कीं त्या सर्व माता बंधूभागिनींनी हे कार्यक्रम ज्यास्त आपलेपणानें पार पाडावे. दुपारचा वेळ व रात्रीची वेळ, ह्या कार्यक्रमाच्या अत्यंत अडचणीच्या वेळा;

ह्या कार्यक्रमांत हौशीनें भाग घेणारी कांहीं मंडळी आहेत–उदाहरणार्थ, श्री. शेळ्ये पतिपत्नी, श्री प्रभु पति पत्नी, श्री. वसंतराव आपटे, हिशेबनीस मुंबई कचेरी, श्री. सद्दाणकर, श्री. श्याम मिराणी, बागवे, कोल्हाटी, नागपुरे वगैरे. यंदा अकोला खामगांवचे श्री. शेवलकर ह्या नांवाचे भक्त आले होते ते रात्रभर जागे होते; पण ह्या मंडळींना फार ताण पडतो व जर हा कार्यक्रम शिस्तबद्ध करण्याचें ठरविलें तर कोणालाही फारसा त्रास न पडतां, व्यवस्थित रीतानें पार पडूं शकेल. दि. ३० ला सकाळीं ६ वाजतां या कार्यक्रमांची मिरवणुकीनें समाप्ति करण्यांत आली.

दि. २९ ला संध्याकाळीं ४ ते ६॥ पर्यंत कीर्तन झालें. दि. ३० ला सकाळीं ११ ते १२ पर्यंत पुण्यतिथीचें कीर्तन दि. १ ला रात्रीं पालखी मिरवणुकीनंतर संस्थान विश्वस्त श्री. नानासाहेब रासने यांचें कीर्तन झालें. दि. २ ला दुपारीं ११ वाजतां संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांचें काला कीर्तन होऊन दही हंडी फोडून काल्याचा प्रसाद सर्वांना वाटण्यांत आला.

दि. ३० व १ ह्या दोन दिवशीं भिक्षा मागण्यांत आली व ३० ला दुपारीं १२ ला आराधना विधी करण्यांत आला. त्याच दिवशीं सायंकाळीं ५ ते ६॥ पर्यंत मंत्रजागर करण्यांत आला; व रात्रीं १०॥ ते सकाळीं ६ पर्यंत सर्व कलाकारांची हजरी श्रींच्या समाधीपुढें झाली. संस्थानचे शिर्डीचे खजिनदार श्री. शालिग्राम द. नागरे, यांनीं अत्यंत अल्पकाळांत एक पद रचून म्हणून दाखविलें. त्यांना येवढीच विनंती करावीशी वाटतें कीं त्यांनीं आपल्या प्रतिभेचा उपयोग श्रींच्यावर सुंदर पदें करण्याकडे करावा.

संस्थानच्या सर्व नोकरांना प्रत्येकीं रु. ५ पांच ह्या उत्सवाच्या निमित्तानें देण्यांत आले. सर्व गांवकऱ्यांना व नोकरांना एकवेळ जेवण देण्यांत आलें.

श्रींच्या समाधीवर घातलेली व जुनी झालेली वस्त्रें, नेहमीप्रमाणें प्रसाद म्हणून लिलांवानें देण्यांत आलीं. भक्त लोक हा प्रसाद घेण्यास फार उत्सुक दिसतात.

तीन दिवस पालखीची व रथाची मिरवणूक घेण्यांत आली होती. ह्या मिरवणुकीत श्री. बापुराव माने, श्री. देशपांडे, श्री. नरेंद्र सावंत, श्री. राम देसाइ वगैरे स्वयंसेवक मंडळी फारच उत्साहानें भाग घेत असतात. स्वयंसेवकांच्या कामांत श्री. रावसाहेब थोरात, श्रीपतराव जाधव, व श्री. वर्तक हे प्रामुख्यानें पुढाकार घेत असतात.

वरील कार्यक्राम हे नित्याच्या कार्यक्रमाव्यातिरिक्त होते.

श्रींनीं त्यांच्या भक्तांचे व त्यांच्या सर्व कुटुंबियांचे व चराचर विश्वाचें सदैव कल्याण करात असावें एवढीच श्रींच्या दिव्य चरणारविंदी प्रार्थना करून रजा घेतो.

**पदीं सांई तूझ्या मनानें रमावें ।**
**हृदीं कीर्तना मोद तुझ्या न मावे ।**
**त्वदर्चा करा या सुमांनीं जमावें ।**
**स अष्टांग कायें प्रभोत्वां नमावें ।**

संतांचा चरणरज

**जानकी बाळकृष्णतनय.**

———

# वेदान्ताचें सारसर्वस्व

—स्वामी विवेकानंद

तुम्हीं जगांत कसें वागावें, भगवंताला सर्वत्र कसें पहावें व हें जीवन सुवर्णमोलाचें कसें बनवावें हें वेदान्त सांगतो. पण ऐकतो कोण ? जे भाग्यवंत असतात त्यानाच तो संदेश झेलतां येतो.

## गर्जेल तो कोसळेल काय ?

कधीं कधीं हिवाळ्यांतही कडाडून मेघगर्जना होते; एखादा प्रचंड ढगही आकाशांत तळपूं लागतो; गर्जनेमागून गर्जना होऊं लागते; परंतु पाऊस मात्र पडत नाहीं. आणि तेंच पावसाळ्यांत पहा. मेघांची गर्जना मुळींच होत नाहीं; असें असतांही न गरजतां पाऊस मात्र कोसळत असतो. म्हणतात ना कीं गर्जेल तो कोसळेल काय ?

त्याचप्रमाणें जे खरेखुरे सेवाभावी कार्यकर्ते आहेत व ज्यांचीं मनें बंधुभावानें भारलीं गेलीं आहेत, त्याचप्रमाणें ज्यांना इतरेजनांसाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असें वाटतें. ते बोलण्याच्या भानगडींत फारसे पडत नाहींत; ते आपल्या सत्कृत्यांच्या रूपानें बोलत असतात. ते बोलतच नाहींत. त्याचीं कृत्यें बोलतात. एखाद्या चिमुकल्या डबक्यांत वावरणें त्यांना आवडत नाहीं. त्यांचे क्षेत्र विशाल व दृष्टी व्यापक असते. त्यांना सर्वत्र आपलीं भावंडें दिसत असतात. त्यांची कृति, त्यांचें वागणें व बोलणेंसवरणें सारे विशाल बंधूभावाच्या तत्वावर आधारलेलें असतें. त्यांना सर्वांबद्दल प्रेमभाव व सहानुभूति वाटत असते. ते बोलत नसतात; ते आपलें कर्तव्य पालन करून जगांत वावरत असतात व अशारीतीनें कृतीचें जीवन जगत असतात.

आणि अशारीतीनें तुम्हीं आपलें सारें जीवन घालवावें असें वेदान्ताचें सांगणें आहे.

## वेदान्ताची हीच शिकवण

प्रथम काय सांगितलें ? प्रथम कार्य कसें करावें हें सांगितलें. आम्हीं स्वतःला विसरून दुसऱ्यांसाठीं वावरावें, दुसऱ्यांसाठीं झटावें. या अशाश्वत जगांत आपण शाश्वत राहूं असें वागावें.

होय, परंतु याचा अर्थ काय? याचा अर्थ सर्वभूती भगवंत पहाणें. सर्वभूतींच नव्हेतर सर्वत्र आणि ती दृष्टि बाळगून कार्यरत व्हावयाचें. भगवंत सर्वव्यापी आहे आणि त्याच्यासाठीं जगायचें व त्याच्या नावानें वतायचें, दीर्घकाळ जगावयाचें, सुखासमाधानाचें जीवन जगावयाचें, दुःखीकष्टी केव्हांही व्हायचें नाहीं. आळसांत एखादा क्षणही दवडायचा नाहीं हीच आमच्या वेदान्ताची सर्वस्पर्शी शिकवण आहे.

अशा रीतीनें तुम्हीं कार्य करीत राहिलां म्हणजेच या जंजाळातून मुक्त होण्याचा मार्ग तुम्हांला आपोआप सांपडेल. तोच तुमचा वाटाड्या होईल. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. हा सांगितला हाच राजमार्ग आहे.

जगाला शिव्याशाप देण्यांत काय फायदा? संसार तापापासून सुटका करून घ्यायला जंगलांत जावयाचें, जिवाचे हालहाल करायचे, उपासतापास करायचे, आत्म्याला त्रास द्याव-याचा कणाकणानें झिजावयाचें व कणाकणानें मरावयाचें, मन मारावयाचें, स्वाभाविक भावनांचा चक्काचूर करून टाकावयाचा, साऱ्या इंद्रियांचा कोंडमारा करून टाकावयाचा, कठोर, शुष्क बनावयाचें, हा मार्ग कल्याणाचा नव्हे. तो चुकीचा व घातक मार्ग आहे.

तेव्हां कार्यरत व्हा; भगवंताची आठवण प्रत्येक घटकेला करा, त्याच्यासाठीं जें कांहीं करायचें तें करा. तो सर्वत्र व्यापलेला व सर्व साक्षी आहे हें मनावर पूर्णपणें बिंबवा. हें जीवन ईश्वर समर्पित आहे, हे त्याचें जीवन आहे, त्याच्यासाठीं जगायचें व त्याच्या-साठीं रावायचें एवढेंच आमचें कर्तव्य. कामाशिवाय एक क्षणही वायां दवडायचा नाहीं. या जगांत येऊन आम्हीं एवढेंच साधावयाचे आहे.

ईश्वर सर्व व्यापी आहे. तो तुमच्या अंतर्यामी आहे. मग त्याला शोधण्यासाठीं कुठें जावयाचें, कुठें भटकायचें?

### तो सर्वव्यापी आहे

जी संपत्ति तुम्हीं भोगलां, त्या संपत्तींत तो आहे. तुमच्या मनांत इच्छा आकांक्षा निर्माण करणारा तोच! तुमची इच्छा पूर्ण करण्यासाठीं ज्या ज्या वस्तू तुम्ही घेतां त्यांतही तो आहे. तुमच्या सुंदर कपड्यालत्त्यांत व तुमच्या दागदागिन्यांत तोच आहे. या दृष्टीनें तुम्हीं प्रत्येक गोष्टीकडे व प्रत्येक वस्तूकडे पहावयाचें. तुमच्याठायीं ही दृष्टि एकदां बाणली म्हणजे सर्व वस्तूंना नवा झगझगीत मुलामा दिलेला तुम्हांला आढळून येईल.

तुमच्या प्रत्येक हालचालींना, प्रत्येक बोलण्या-चालण्यांत संभाषणांत व प्रत्येकबाबतींत भगवंताला प्राधान्य देऊं लागलां, प्रत्येक गोष्ट त्याच्या नांवें व त्याच्यासाठीं करूं लागलां, म्हणजे तुमच्या जीवनाचा सारा दृष्टीकोण आरपार बदलून जाईल व हें जग दुःखतापानें व्यापलेलें तुम्हांला दिसणार नाहीं. हें जग म्हणजे नर्कवास आहे असें न वाटतां तो स्वर्गलोक आहे, तें नंदनवन आहे असेंच तुम्हांला वाटूं लागेल.

## रडून काय होणार ?

एखाद्या खोलींत अनेक वर्षांपासून अंधार पडलेला असेल; त्यांत कधीं कोणी राहिला नाहीं किंवा कधीं कोणी दिवाबत्ती लावली नाहीं ! मग तेथें काळोखच असणार. तशा स्थितींत त्या खोलींत एकीएकीं प्रवेश करून जर तुम्हीं काय हा घनदाट अंधकार ! हा कसा नाहींसा होणार ! असें म्हणून ऊर बडवून घेऊन आक्रोश करूं लागलांत, तर तो अंधकार नाहींसा होईल का ? मग केलें पाहिजे काय ? त्या खोलींत एखादी बत्ती आणायची व काडी पेटवून लावायची ! म्हणजे मग खोलीभर प्रकाशच प्रकाश होईल नाहीं का ?

त्याच प्रमाणें तुम्हीं ' अहो ! काय सांगू ? मी जन्मभर दुष्कृत्यें करीत आलों आहें. माझ्या हातून अनंत अपराध घडले आहेत.' असें तुम्हीं सतत बडबडत राहिला तर त्याचा कांहीं तरी उपयोग आहे. का ? सत्कार्ये करूं लागा, अज्ञानांधकार घालविण्यासाठीं झटा मग सर्वत्र प्रकाशच प्रकाश ! तीच तुमच्या जीवनांतील खरीखुरी दिवाळी !

## सारीं मंगलाचीं मंदिरें

तुम्हीं स्वतःला अमंगल, अपवित्र कां बरं समजतां ? तुम्हीं सदा पवित्र, सदा मंगल अहात. त्या जगन्मंगलाचें वास्तव्य तुमच्याठायीं असतां तुम्हीं अमंगल कसे ! आणि तुमच्या सभोंवार तुम्हीं जें जें पहातां, जे जे प्राणिमात्र तुमच्या दृष्टीस पडतात तीं तीं सर्व त्या मंगलाचीं मंदिरें आहेत.

तुम्हांलाच नव्हे तर कोणालाही अमंगल मानूं नका. त्या महन्मंगलावर ओढण्यांत आलेला अज्ञानाचा पडदा फाडून त्याचे तुकडे तुकडे करून टाका. उठा, जागे व्हा. स्वतःला ओळखुन इतरांच्या ठिकाणींही तीच प्रकाश ज्योत पहा व कामाला लागा. यश तुमचें आहे.

## सर्वांत मोठी कामगिरी

स्वत्वाची ओळख पटवून घेणें हीच सर्वांत मोठी कामगिरी व महत्तम प्रार्थना. अज्ञानाला अंतःकरणांत वाव देऊं नका. तुम्हीं पवित्र काय व्हायचें, मंगल काय व्हायचें ! तुम्हीं पवित्र अहांत व मंगलही अहांत.

इच्छा, वासना यांचा त्याग करतां आला पाहिजे. त्याशिवाय देवानें निर्माण केलेल्या या मंगल सृष्टीचें आपणास आकलन करतां येणार नाहीं. वासनांपासून मुक्त व्हा म्हणजे प्रत्येक कोनाकोपऱ्यांत तुम्हाला प्रकाश दिसूं लागेल.

आम्हीं त्याच्या सान्निध्यांत रहाण्याचा धडा गिरवूं. या त्याच्यासाठीं जमूं या. त्याच्या नांवें प्रत्येक कृति करूं या. आनंदाचें जीवन जगणें, जीवन सुवर्ण मोलाचें बनविणें तें हेंच.

अशाप्रकारचें जीवन जगण्यासाठीं आम्हीं अहोरात्र प्रयत्न करूं या.

# श्री साईबाबांचीं बोध वचनें

संग्राहक : **नानासाहेब रासने**

१. असत्य बोलूं नका; सत्याची कांस धरा.

२. काया–वाचा–मनानें व्यभिचार करूं नका.

३. दुसऱ्याच्या श्रमाचें, धनाचें, बुद्धीचें आणि भावनेचें अपहरण करूं नका.

४. उपासतापासानें शरीर मारूं नका; ज्याचें शरीर सुदृढ त्याचें मनही सुदृढ असतें.

५. माणसानें निर्मिलेलें दुःख माणसानेंच दूर केलें पाहिजे. देवानें निर्मिलेल्या दुःखासाठींच देवाला हांक घालावी.

६. माणसाला 'सो ऽहम्' चा अहंकार अवश्य असावा.

७. स्वतःच्या मनाला विसरणाऱ्यालाच दुसऱ्याचें मन जाणतां येतें.

८. ज्याला स्वतःचा प्रपंच आवरतां येत नाहीं, त्यानें परमेश्वराच्या प्रपंचाला हात लावूं नये.

९. तुम्हांला हवा असलेला पुत्र, पैसा आणि पत्नि जिथें प्रत्यक्ष परमेश्वर देऊं शकत नाहीं तिथें परमेश्वराच्या दाराबाहेर उभे असलेले बुवा, बाबा आणि बैरागी कुठून देणार कपाळ !

१०. या जगांत आपण 'नग्न' आलों आणि या जगांतून जातांना 'नग्न' होऊनच आपल्याला जावें लागणार आहे, हें विसरूं नका !

११. दुसऱ्याचें दुःख जाणून तें हलकें करण्याचा प्रयत्न करा; कारण त्यांतच तुमचें स्वतःचें दुःख हलकें होणार आहे.

---

# आत्मज्योति हीच सर्वश्रेष्ठ

**प्रश्न**—या जगांतील साऱ्या वस्तू आपण कशाच्या सहाय्यानें पहातों ?

**उत्तर**—दिवसा सूर्यनारायणाच्या व रात्रीच्यावेळीं बत्तीच्या सहाय्यानें.

**प्रश्न**—ठीक आहे; तुम्ही सूर्यनारायण, बत्त्या वगैरे कशाच्या सहाय्यानें पहातां ?

**उत्तर**—डोळ्यांच्या सहाय्यानें !

**प्रश्न**—डोळ्यांत फूल पडल्यामुळें किंवा अन्य कारणामुळें डोळ्यांचे कार्य होत नसलें तर !

**उत्तर** ज्ञाननेत्राच्या किंवा बुद्धिमत्तेच्या सहाय्यानें तें कार्य पार पाडतों.

**प्रश्न**—तें ज्ञान किंवा बुद्धिमत्ता आपणास कशी जाणवते.

**उत्तर**—माझ्याठायीं जो कोणी '**मी**' म्हणून आहे त्याच्यामुळें ती जाणीव होऊं शकते.

**प्रश्न**—मग तुम्हींच परम श्रेष्ठ अशी ज्योति नाहीं का ?

**उत्तर** होय; अगदीं बरोबर; असेंच हें गणीत आहे. सर्वांत श्रेष्ठ म्हणजे आत्मज्योतीच होय; आणि ती तुमच्याठायीं वास करीत आहे.

—**श्रीशंकराचार्य**

---

# शोचनीय निधन

कळविण्यास दुःख वाटतें कीं, श्री साईभक्त सुंदरराव दिनानाथ नवलकर हे गुरुवार दि. १३ आक्टोबर १९६० रोजीं सकाळीं ८-५६ वा. आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी श्रीसाईचरणीं विलीन झाले. त्यांचा जन्म मुंबईत पाठारे प्रभुज्ञातींत सन १८७८ मध्यें झाला. प्रकृतीमुळें त्यांना कॉलज शिक्षण पूर्ण करतां आलें नाहीं. तरी १९०८ सालीं इंग्लंडमध्यें शेतीचा अभ्यास करून रॉयल अग्रिकल्चर सोसायटीचे पहिले हिंदी सभासद झाले. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे ते दोन वेळां सभासद होते. मुंबई प्रांतिक कॉंग्रसचे ते सन्माननीय चिटणीस व खजिनदार होते. स्टुडंटस् लिटररी व सायंटीफीक



सोसायटींत सन्माननीय शिक्षक तसेंच सन्माननीय खजिनदार शिवाय प्रॉपर्टी असोसिएशनच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सभासद होते. आपल्या ज्ञाती संस्थांतही काम करीत होते. १९१० सालीं कै. नानासाहेब चांदोरकर यांनीं त्यांस प्रथम श्री साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घडवून आणला. त्यांच्या हातून सन १९१८ पर्यंत श्री साईबाबांची सेवा प्रत्यक्ष घडत गेली. साईसंस्थान अस्तित्वांत आल्या-नंतर कांहीं वर्षे संस्थानाचे चिटणीस व कै. बाबासाहेब तर्खड नंतर सन्माननीय खजिनदार झाले. त्याचवेळीं साईलीलेचे संपादकही होते. गेल्या वर्षापर्यंत त्यानीं शिरडीची वारी केली. संस्थानच्या प्रत्येक वार्षिक सभेस हजर राहून जातानें लक्ष घालीत असत. त्यांचे एक पुत्र डॉ. भोलानाथ नवलकर M.Sc. PhD, F.B.S. आणि घरची सर्व मंडळी श्री साईंची परम भक्त आहेत.

श्री समर्थ साईबाबा कै. सुंदरराव नवलकर यांच्या आत्म्यास शांति देवोत.




## सप्टेंबर १९६०

चालू महिन्यांत भक्तांची गर्दी कमी होती

**कीर्तनः**—श्री. श्री. बा. ऊर्फ बाबूराव देव (सं. द्र.) ह. भ. प. उत्तमराव (बोदवड) श्री. मराठे सं. गवई.

**नकलाः**—श्री. लव्हाटे, मुंबई.



**गायनः**—श्री. एन्. बी. मोरकर बलवंत संगीत विद्यालय, परेल, मुंबई १२. कु. रेखा सोनवणे, नाशिक. कु. सिंधू सोनवणे, नाशिक. श्री. शशिकांत हुवळे, वेंगुर्ला. सौ. लिलाबाई शेवाळे, औरंगाबाद, सौ. मिराबाई राजगोपाळस्वामी, मुंबई. श्री. भालचंद्र पंचाक्षरी, बडोदा. श्री. किसनराव इंगळे, नगर. कु. आशालता कुलकर्णी, नगर. श्री. सदाशिव काजरेकर, मुंबई. श्री. जनार्दन गोपाळ हटकर, मुंबई.

**नृत्याचे कार्यक्रम**—नवमहाराष्ट्र नृत्यमंडळ, औरंगाबाद, मंगल नृत्यकला मंडळ पुणें (पुणेडान्सिंग पार्टी) अशा तीन नृत्य मंडळ्या आल्या होत्या.

**नामदार यशवंतराव चव्हाण,** महाराष्ट्र राज्य मुख्य (मंत्री) तसेंच शेती-खात्यांतील कांहीं मुख्य अधिकारी श्रींचे दर्शनास आले होते. व महाराष्ट्र राज्याचे मुख्य न्यायमूर्ती श्री. मुधोळकर वगैरे मंडळी श्रीसाईबाबांचें दर्शनास शिरडीस येऊन गेली.

---



तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रसतापूर, हैद्राबाद १२. [ आंध्र प्रदेश ]**

